cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–९९ | मंगळवार दि.३० जुलै २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### महानगरांचे बकालपण उघडे पाडले

अलीकडील काळात आपल्या देशात स्मार्ट शहरे निर्माण करण्याची टूम निघाली होती. त्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार ने कोट्यवधींचा निधी उपलब्ध करून दिला, या निधीतून शहरे तर स्मार्ट झाली नाही परंतु शहरे स्मार्ट करण्यासाठी जे काही मेकअप आर्टिस्ट नेमण्यात आले होते त्यांची सात पिढ्यांची गरीबी मात्र नक्कीच दूर झाली, अर्थात सगळा मलिदा त्यांनीच लाटला असे नाही. यासाखळीत मंत्र्यापासून ते खालच्यापर्यंत सगळ्यांनीच हात धुवून घेतले. या भ्रष्टाचाराचे विद्रूप दर्शन गेल्या आठवड्यातील मुसळधार पावसाने घडवून आणले असेच म्हणावे लागेल.

### सीबीआयकडून केजरीवाल यांच्याविरुद्ध आरोपपत्र दाखल

नवी दिल्लीः सीबीआयने दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्याविरुद्ध अबकारी धोरण प्रकरणी आरोपपत्र दाखल केले असल्याची माहिती सीबीआय अधिकाऱ्याने दिली आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना सीबीआयने २६ जून रोजी तिहार तुरुंगातून अटक केली होती. जिथे ते अद्याप ईडीने दाखल केलेल्या मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात न्यायालयीन कोठडीत आहेत. केंद्रीय अन्वेषण ब्युरो (सीबीआय) ने अबकारी धोरण प्रकरणात केजरीवाल आणि इतरांविरुद्ध दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू कोर्टात आरोपपत्र दाखल केले आहे. सीबीआय आणि ईडीने आता अबकारी घोटाळ्याप्रकरणातील चौकशी पूर्ण केली आहे.

# गतवर्षीच्या कापूस, सोयाबीन अनुदानासाठी ४ हजार १९४ कोटी रूपये वितरणास मान्यता

## शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी पाच हजार रुपये मिळणार–ना.धनंजय मुंडे



**मुंबई । प्रतिनिधी**


**सन २०२३ च्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसंकल्पात केलेल्या घोषणेप्रमाणे प्रति हेक्टरी ५ हजार रुपये अर्थसहाय्य देण्याचा निर्णय आज कृषी विभागाने घेतला असल्याची माहिती कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय कृषी विभागाने निर्गमित केला आहे. अनुदानासाठी ४ हजार १९४ कोटी रूपये वितरीत करण्यासाठी शासनाने मान्यता दिली आहे.**

सन २०२३ मध्ये बहुतांश भागात पावसाचे प्रमाण कमी असल्याने त्याचबरोबर कापूस व सोयाबीनचे भाव पडल्याने शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागले होते. मात्र महायुती सरकारने या शेतकऱ्यांना अर्थसहाय्य देण्याची घोषणा लोकसभा निवडणुकीच्या आधीच केली होती. त्याचबरोबर त्याची अधिकृत घोषणा नुकत्याच पार पडलेल्या अर्थसंकल्पातही करण्यात आली होती. या निर्णयाची कृषी विभागाने कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात तातडीने अंमलबजावणी केली आहे. राज्यातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना किमान १००० रुपये ◀◀ पान २ वर

### अनुदानासाठी ई पीक पाहणी आवश्यक

सदर अनुदानासाठी ई पीक पाहणी पोर्टल द्वारे पिकांची नोंदणी केलेले शेतकरी अनुदानास पात्र ठरणार असून, डीबीटीद्वारे थेट शेतकऱ्यांच्या संलग्न बँक खात्यात ही रक्कम वर्ग केली जाणार आहे. या निर्णयामुळे राज्यात मागील वर्षी आर्थिक नुकसान सहन करावे लागलेल्या लाखो शेतकऱ्यांना लाभ मिळणार आहे.

## कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्यावर पित्ताशयाची यशस्वी शस्त्रक्रिया



**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्यावर पित्ताशयाची यशस्वी शस्त्रक्रिया मुंबईतील सर एच.एन. रिलायन्स फाऊंडेशन रुग्णालयात करण्यात आली आहे. त्यांना अनेक दिवसांपासून पित्त व पोटदुखीचा त्रास होता. मात्र सतत दौरे, सभा, कामकाज यामुळे प्रकृतीकडे दुर्लक्ष होत होते. मात्र आता पोटदुखीचा त्रास वाढल्याने शस्त्रक्रिया करावी लागली आहे.**

मुंबईच्या गिरगाव भागातील सर एच.एन. रिलायन्स फाउंडेशन रुग्णालयात मुंडेंच्या पित्ताशयावर डॉ.अमित मायदेव यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. बुधवारी ◀◀ पान २ वर

## शिंदे गटाचे खासदार रवींद्र वायकर यांना हायकोर्टाचे समन्स

**मुंबई । प्रतिनिधी**

उत्तर पश्चिम लोकसभा मतदारसंघातील निवडणूक वाद पुन्हा चर्चेत आलाय.शिंदे गटाचे खासदार रवींद्र वायकर यांना हायकोर्टाने समन्स बजावले आहे. अमोल कीर्तीकर यांच्या याचिकेवर उच्च न्यायालयान हे समन्स बजावले. वायकर यांचा विजय रद्द करण्याची मागणी कीर्तीकर यांनी हायकोर्टात केली होती. न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या एकलपिठाने या याचिकेची दखल घेतली. २ सप्टेंबरला न्यायालयात हजर राहण्याचे वायकर आदेश देण्यात आले आहेत.

# तुमचा स्वाभिमान जपण्याची जबाबदारी माझी ; एकजुटीची ताकद अशीच कायम ठेवा

## पंकजा मुंडे: भगवान भक्तीगडावर कार्यकर्त्यांची तुफान गर्दी





**सावरगांव घाट । प्रतिनिधी**

**पक्षाने आपल्याला सन्मान व स्वाभिमान दिला आहे. याचा वंचितांच्या कल्याणासाठी उपयोग करू. लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या राजकारणाचा पायाच वंचितांचा न्याय करणे अशा पद्धतीचा आहे. ज्यांचा कोणी वाली व वाणी नाही त्यांचा खंबीर आवाज बनण्यासाठीच मी राजकारणात आहे. वंचित, उपेक्षित घटकांच्या कल्याणासाठीच माझं आयुष्य समर्पिलेले आहे. पंकजा मुंडे मोठी कधीच नाही, तुम्ही जी जनशक्ती पाठीशी वेळोवेळी उभे करता ती शक्तीच आपले मोठेपण आहे. मला आज तुमच्याकडून एक वचन पाहिजे, तुमच्या लेकीला एक वर्ष द्या, तुमचा स्वाभिमान जपण्याची जबाबदारी माझी आहे. आपसातील भांडण, तंटे विसरा एकजुट व्हा, एकीची ताकद अशीच कायम ठेवा एवढं वचन मला द्या अशा शब्दांत भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांनी भगवान भक्तीगडावरून साद घातली.**

विधानपरिषदेची आमदार म्हणून रविवारी शपथ घेतल्यानंतर पंकजाताई मुंडे यांचे आज प्रथमच जिल्ह्यात आगमन झाले. राष्ट्रसंत भगवान बाबा यांचे जन्मस्थान असलेल्या सावरगाव घाट येथील भगवान भक्तीगडावर जाऊन पंकजाताई मुंडे यांनी माल्यार्पण करून राष्ट्रसंत भगवान बाबांचे दर्शन घेतले. यावेळी ◀◀ पान २ वर

## बोलून दाखवण्यापेक्षा काम करुन दाखवायचे असते

### विधानसभेला २८८ उमेदवार पाडणार, जरांगे पाटलांच्या आव्हानावर पंकजा मुंडेंचं सडेतोड उत्तर

**संभाजीनगर । प्रतिनिधी**

**मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या या वक्तव्यावर भाजप नेत्या आणि नवनिर्वाचित बीडच्या आमदार पंकजा मुंडे यांनी सडेतोड उत्तर दिले आहे. कोणतेही काम करताना बोलून दाखवायचे नसते तर ते काम करून दाखवायचे असते असे पंकजा मुंडे यांनी म्हटले असून २८८ उमेदवार पाडणार या जरांगे पाटलांच्या इशाऱ्यावर त्यांनी सडेतोड उत्तर दिले आहे.**

आगामी विधानसभा निवडणुकीत २८८ उमेदवार पाडायचे की लढवणार हे बैठकीत ठरवणार असे वक्तव्य मनोज जरांगे पाटील यांनी केले होते. २९ ऑगस्ट ◀◀ पान २ वर

#### ओबीसीतून आरक्षण देण्यावर पवारांची भूमिका काय?

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्यावर पवारांची भूमिका काय?, असा सवाल पंकजा मुंडेंनी शरद पवारांना विचारालाय. महाराष्ट्राच्या राजकारणातील शरद पवार मोठे नेते असल्याने त्यांची भूमिका महत्त्वाची असणार आहे. त्यामुळे मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याबद्दल त्यांची भूमिका महत्त्वाची असणार आहे.

## दिव्यांगाना आता अडीच लाख कर्ज

**मुंबई :** दिव्यांग बांधवांना यंदा देखील रोजगार, स्वयंरोजगारासाठी ई–रिक्षा वाटप करण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला. दिव्यांग बांधवांना एकाच छताखाली प्रशिक्षण, समुपदेशन, वैद्यकीय सहायता ◀◀ पान २ वर

## शिवसेनेसह राष्ट्रवादी काँग्रेस आमदार अपात्रता प्रकरणाची सुनावणी एकाच दिवशी

**नवी दिल्ली। वृतसंस्था**

सर्वोच्च न्यायालयात सोमवारी राष्ट्रवादी काँग्रेस आमदार अपात्रता प्रकरणावर सुनावणी पार पडली. यात सर्वोच्च न्यायालयाने अजित पवारांसह त्यांच्या ४१ आमदारांना नोटीस जारी केली. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस आमदार अपात्रता प्रकरण आणि शिवसेना आमदार अपात्रता प्रकरण या दोन्ही महत्त्वाच्या प्रकरणांवर यापुढे एकाच दिवशी सुनावणी होणार असल्याचे न्यायालयाने सांगितले. शिवसेना आमदार ◀◀ पान २ वर




# वस्तुस्थिती मांडून संभ्रम दूर करा

## अनिल देशमुख प्रकरणी नाना पटोले यांचे फडणवीसांना आव्हान

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस एकमेकांवर गंभीर आरोप करत आहेत. अनिल देशमुख यांनी केलेले आरोप खरे आहेत का खोटे हे जाणण्याचा राज्यातील जनतेला अधिकार आहे. फडणवीस हे ७.५ वर्ष गृहमंत्री पदावर आहेत, त्यांना या खात्याचा मोठा अनुभव आहे, त्यांच्याकडे काही व्हीडीओ व ऑडिओ क्लिप्स आहेत असा त्यांचा दावा आहे. देवेंद्र फडणवीस यांच्यात हिम्मत असेल तर त्यांनी वस्तुस्थिती मांडावी व सत्य जनतेसमोर आणून संभ्रम दूर करावा, असे आव्हान काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिले.**



टिळक भवनमध्ये पत्रकारांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, अजित पवार यांच्याविरोधात खोट्या प्रतिज्ञापत्रावर सह्या करण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांनी दबाव आणला होता, हे अनिल देशमुख यांनी जेलमधून जामिनावर बाहेर आल्यानंतरच ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२९ जुलै २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| गहू : ७.०० क्विंटल | | |
| २,५०० | ३,००१ | २,७८४ |
| ज्वारी/हायब्रिड :३३.०० क्विंटल | | |
| २,०९१ | ३,४४१ | २,४७५ |
| मूग :१४.५० क्विंटल | | |
| १,९५० | ३,०४१ | २,४५५ |
| तूर : १४.५० क्विंटल | | |
| १०,२०० | १०,३७२ | १०,२८६ |
| उडीद : ०.५० क्विंटल | | |
| ४,००१ | ४,००१ | ४,००१ |
| बाजरी: २६.५० क्विंटल | | |
| २,५५७ | २,८५१ | २,६७४ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | | |
| १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: १४.०० क्विंटल | | |
| ४,३६० | ४,३६० | ४,३६० |
| हरभरा: ५.०० क्विंटल | | |
| ५,५०० | ६,४०१ | ६,०९७ |

# पिकांच्या हमीभावावरून संसदेत गरमागरमी

## सरकारने शेतकऱ्यांना चक्रव्यूहात अडकवले; राहुल गांधी यांची घणाघाती टिका

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**केंद्रीय अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवसापासून शेतकरी मुद्द्यावर विरोधकांनी आक्रमक भूमिका घेत सरकारला घेरले आहे. सोमवारी दि.२९ रोजी पिकांच्या हमीभावारून चांगलीच गरमागरमी झाली. हमीभाव कायद्यासोबत शेतमालाचे भाव आणि जमीन धारणा आणि कृषी कायद्यावरून लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सरकारला धारेवर धरले. सरकारने शेतकऱ्यांना चक्रव्यूहात अडकवले असल्याचा घणाघाती आरोपही राहुल गांधी यांनी केला. दरम्यान, इंडिया आघाडी सरकार आले की, शेतकऱ्यांसाठी हमीभाव कायदा करू असे आश्वासन राहुल गांधी यांनी यावेळी दिले.**

राहुल यांनी महाभारतातील चक्रव्युहाचे उदाहरण दिले. देशाला आजच्या काळात सहा लोकांनी चक्रव्युहमध्ये अडकवले आहे. ते सहा लोक म्हणजे नरेंद्र मोदी, अमित शाह, मोहन भागवत, अजित डोवाल, अदानी आणि अंबानी आहेत, असा आरोप त्यांनी केला. त्यामध्ये केंद्र सरकारने शेतकऱ्यांनाही अडकवले आहे, असेही राहुल म्हणाले. त्यावरुन संसदेत एकच गोंधळ उडाला. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी आक्षेप घेतला. त्यावर अदानी, अंबानीचे नाव न घेण्याची सूचना आली. मी उद्योगपतींचे नाव न घेता ए १ आणि ए २ असा उल्लेख करतो, असे म्हणत राहूल यांनी रिजिजू यांना टोलाही लगावला. हमीभाव कायदा, शेतकरी कर्जमाफीसह विविध मागण्यांसाठी दिल्लीकडे निघालेल्या शेतकऱ्यांना हरियाणा सरकारने केंद्र सरकारच्या इशाऱ्यावरून रोखून ठेवले आहे. अर्थात त्यामागे केंद्र सरकारचा हात असल्याचे उघडपणे दिसते. दिल्लीत शेतकरी येऊ नयेत, यासाठी सरकारने कसलीही कसर ठेवलेली नाही. त्यामुळं आंदोलक शेतकरी संघटनांनी राहुल गांधी यांची भेट घेऊन संसदेत यावर खासगी बिल आणण्याची मागणी केली होती. कारण केंद्र सरकार आंदोलक शेतकऱ्यांच्या मागण्यांची दखल घेत नाही. त्यामुळे राहुल गांधी यांची शेतकरी नेत्यांनी भेट घेऊन विनंती केली. त्यानंतर राहुल गांधी यांनी शेतकरी नेत्यांना आश्वासन दिले. त्यामुळे राहुल संसदेत बोलतील अशी शक्यता होती. त्यानुसार राहुल यांनी सोमवारी अर्थसंकल्पावर बोलताना आपला मोर्चा हमीभाव कायद्याच्या मागणीकडे वळवला. शेतकरी नेत्यांना संसद परिसरात येऊन दिले जात नव्हते, असा आरोप राहुल गांधी यांनी केला. त्यावरून सत्ताधारी – विरोधकांमध्ये आरोप प्रत्यारोप केले गेले. शेवटी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी राहुल गांधी यांना नियमानुसार संसदेच्या परिसरात तुमची भेट घेता येऊ शकते. पण सदस्यांशिवाय इतर कुणीही संसद परिसरात ◀◀ पान २ वर



cmyk

## अग्रलेख

# महानगरांचे बकालपण उघडे पाडले

अलीकडील काळात आपल्या देशात स्मार्ट शहरे निर्माण करण्याची टूम निघाली होती. त्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार ने कोट्यवधींचा निधी उपलब्ध करून दिला, या निधीतून शहरे तर स्मार्ट झाली नाही परंतु शहरे स्मार्ट करण्यासाठी जे काही मेकअप आर्टिस्ट नेमण्यात आले होते त्यांची सात पिढ्यांची गरीबी मात्र नक्कीच दूर झाली, अर्थात सगळा मलिदा त्यांनीच लाटला असे नाही. यासाखळीत मंत्र्यापासून ते खालच्यापर्यंत सगळ्यांनीच हात धुवून घेतले. या भ्रष्टाचाराचे विद्रूप दर्शन गेल्या आठवड्यातील मुसळधार पावसाने घडवून आणले असेच म्हणावे लागेल.

खरे तर हे याच वर्षी झाले असे नाही, दरवर्षी पावसाळ्यात हेच चित्र विविध शहरांमध्ये दिसून येते. नदीकाठच्या रहिवासी भागात, खोलगट भागात असलेल्या वस्तीत पाणी शिरणे, ते तिथेच तुंबून राहणे आणि त्यामुळे रहिवाशांची होणारी प्रचंड दैना, हा सगळा प्रकार दरवर्षीच अनुभवास येतो. पुण्यात यावेळी तर अगदी कहर झाला. पावसाचे आणि पुराचे पाणी गरीबांच्या झोपड्यांत शिरते त्यात गरीबांचा संसारही वाहून जातो. परंतु यावेळी पुण्यात उच्चभ्रू समजल्या जाणाऱ्या लोकांच्या वस्तीतही पावसाच्या पाण्याने घुसखोरी केली. अनेक मजली ईमारतीच्या खाली चार ते पाच फूट पाणी साचल्याचे दृश्य यावेळी पाहायला मिळाले. काही भागातून तिथे राहणाऱ्या लोकांना होडीतून सुरक्षित स्थळी हलवावे लागले. ही परिस्थिती केवळ पुण्यातच होती असे नाही, मुंबईसह इतर अनेक महानगरांमध्येही अशीच आणीबाणीची परिस्थिती पाहायला मिळाली. असे काही झाले की चर्चा सुरू होते ती नगर नियोजनाची, हे देखील दरवर्षीचेच. मुंबईत सांडपाणी वाहून नेणाऱ्या व्यवस्था जवळपास शंभर वर्षांपूर्वीची आहे. शंभर वर्षांपूर्वीच्या मुंबईच्या लोकसंख्येसाठी ती योग्य होती, परंतु मुंबईतील आजच्या गर्दीला ही व्यवस्था न्याय देऊ शकत नाही. परंतु या व्यवस्थेत काळानुरूप बदल करण्याची किंवा ही व्यवस्था आधुनिक करण्याची गरज कोणत्याही सरकारला वाटत नाही. दरवर्षी तात्पुरत्या उपाययोजना केल्या जातात, पावसाळयाच्या सुरुवातीला नालेसफाईची कंत्राटे दिली जातात, त्यात प्रचंड भ्रष्टाचार होतो, ते काम किती प्रामाणिकपणे झाले हे पहिल्याच मुसळधार पावसात रस्त्यांना येणारे नदीचे स्वरूप दाखवून देते. आपली शहरे पायाभूत सुविधांच्या बाबतीत मोठी खेडी आहेत, जिथे जागा उपलब्ध असेल, जिथे भूखंड मोकळा असेल तिथे घरे उभी केली जातात. शहरे अशाप्रकारे फुगत असताना या शहरांची रस्ते, वीज, पाणी अशा सुविधांच्या संदर्भात किती लोकांना सामावून घेण्याची क्षमता आहे, याचा विचारच केला जात नाही. बांधकामाच्या सगळ्या नियमांचे उल्लंघन करून वाटेल तिथे वाटेल तशा इमारती उभ्या केल्या जातात. परवा पुण्यात पाण्याखाली गेलेले निंबजनगर मुठा नदीच्या अगदी पात्राजवळ उभे झाले आहे. नदी पात्रालगत बांधकामांना परवानगी देताना नियम बासनात गुंडाळून ठेवले जातात. कंत्राटदार घरे बांधून, विकून मोकळा होतो, त्याचे काहीच नुकसान होत नाही. परंतु पुढचे भोग आपल्या आयुष्याची पूंजी गमावून ही घरे घेणाना सामान्य लोकांना भोगावे लागतात. नगर रचनेशी, नगर नियोजनाशी देणेघेणे नसलेले राज्यकर्ते, त्यांना सामील असलेले प्रशासनातील अधिकारी आणि या दोघांच्या जीवावर बेफाम सुटलेले बांधकाम व्यावसायिक यांच्या अभद्र युतीने शहरांचा सगळा मेकअपच घालविला आहे.

२६ जुलै २००५ च्या अतिवृष्टीनंतर मुंबईत मिठी नावाची नदी आहे, याचा शोध लागला, तसेच आता पुण्यातून मुठा नदी वाहते हे पुणेकरांच्या लक्षात आले असेल. मुठा नदीच्या पात्रालगत अनेक बांधकामे झाली आहेत. या बांधकामांना कुणी परवानगी दिली, हा खरे तर प्रश्नच नाही. परवानगी कुणी दिली, मलाई कुणी ओरपली हे सगळे उघड सत्य आहे. केवळ मुंबई किवा पुण्याचाच हा प्रश्न नाही. एकीकडे आपण स्मार्ट सिटी उभ्या करण्याच्या बाता करतो, मेट्रोचे गुणगाण गातो, बुलेट ट्रेनचे कौतुक करतो आणि दुसरीकडे एखाद दुसऱ्या मुसळधार पावसात रस्त्यांच्या झालेल्या नद्या आपले पाय अजूनही चिखलातच आहेत साची वास्तविक आणि तीव्र जाणीव आपल्याला करून देतात. आपला स्मार्ट मेकअप एकाच पावसात धुवून निघतो आणि आपले बटबटीत वास्तव उघडे पडते.

# आ.पंकजाताई मुंडेंचं जिल्ह्यात दिमाखदार एन्ट्रीने अनोखं सोशल इंजिनिअरिंग

- धाकट्या पंढरीत फटाक्यांची आतिषबाजी ; बीडमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांना क्रेनवरून पुष्पवृष्टी
- गोपीनाथ गडावर नतमस्तक; परळीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे, छत्रपतींना केले वंदन





**बीड । प्रतिनिधी**

**भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांचं विधानपरिषदेच्या आमदार झाल्यानंतर पहिल्यांदाच बीड व परळी शहरात आगमन झालं, त्यांनी हार तुरे नाकारले असले तरी त्यांचं जिल्ह्यात दिमाखदार स्वागत झालं. धाकटी पंढरी श्रीक्षेत्र नारायणगडावर फटाक्यांच्या आतिषबाजीत जोरदार स्वागत करण्यात आलं. बीड शहरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यावर त्यांनी पुष्पवृष्टी केली. गोपीनाथ गडावर पित्याच्या चरणी त्या नतमस्तक झाल्या तर परळीत डॉ बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास त्यांनी वंदन केले. एकूणच जिल्ह्यात दिमाखदार एन्ट्रीने त्यांनी केलेल्या सोशल इंजिनिअरिंगचं कौतुक होत आहे.**

आ. पंकजाताई मुंडे यांनी सकाळी भगवान भक्तीगडावर राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या स्मारकाचे दर्शन घेऊन कार्यकर्त्यांशी संवाद साधला, त्यानंतर त्यांनी थेट धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र नारायणगडावर जावून संत नगद नारायण महाराजांचे आशीर्वाद घेतले. याठिकाणी गडाचे महंत शिवाजी महाराज यांची भेट घेऊन त्यांचेही आशीर्वाद घेतले. याठिकाणी आगमन होताच प्रवेशद्वारावर त्यांचं फटाक्यांची आतिषबाजी करून स्वागत झालं. तत्पूर्वी नवगण राजूरी येथील गणपतीचे त्यांनी दर्शन घेतले.

### बीडमध्ये छत्रपतींच्या पुतळ्यावर क्रेनने पुष्पवृष्टी

पंकजाताई मुंडे यांची बीड शहरात जोरदार एन्ट्री झाली. कार्यकर्त्यांनी वाजतगाजत त्यांचं भव्य स्वागत केलं. छत्रपती शिवाजी महाराज चौकात छत्रपती शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्यास त्यांनी स्वतः क्रेनच्या बास्केटमधे चढून पुष्पवृष्टी करत अभिवादन केले. भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### गोपीनाथ गडावर नतमस्तक

बीडहून परळीकडे जाताना रस्त्यात वडवणी, तेलगाव, दिंद्रुड, सिरसाळा येथे कार्यकर्त्यांनी त्यांचं स्वागत केलं. गोपीनाथ गडावर आल्यावर पंकजाताईंनी लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या समाधीला पुष्पहार अर्पण करून दर्शन घेतलं. परळीत येताच रेल्वे स्टेशन परिसरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून त्यांनी वंदन केलं. छत्रपती शिवाजी महाराज चौकात राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने त्यांचं वाजतगाजत, फटाक्यांच्या आतिषबाजीत जंगी स्वागत करण्यात आलं. याठिकाणी त्यांनी छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून वंदन केलं.

# आम्हाला जातीय सलोखा राखायचा, पण काहींना राजकीय पोळी भाजायची

## प्रवीण दरेकर यांचा शरद पवारांना टोला

**मुंबई । प्रतिनिधी**

**आम्हाला जातीय सलोखा राखायचा, पण काहींना राजकीय पोळी भाजायची असे शरद पवारांवर थेट हल्लाबोल प्रवीण दरेकर यांनी केला आहे.**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी राज्याच्या सध्याच्या परिस्थितीवर भाष्य करताना मणिपूरचा घटनेचा उल्लेख करत चिंता व्यक्त केली. शरद पवार यांनी मणिपूरचा उल्लेख करणेच सत्ताधाऱ्यांच्या जिव्हारी लागले आहे. याआधी शिवसेनेचे संजय शिरसाट यांनी शरद पवार यांच्यावर या मुद्द्यावरुन निशाणा साधला. त्यानंतर आता भाजप नेते प्रवीण दरेकर यांनी निशाणा साधला आहे. ते म्हणाले, सरकारची स्पष्ट भूमिका आहे की, जातीय वादावरून दोन समाजामध्ये तेढ निर्माण होऊ नये. ओबीसी समाजाला, मराठा समाजाला न्याय देणं ही आमची भूमिका आहे. आम्हाला राज्यात जातीय सलोखा राखायचा आहे. पण काहींना राजकीय पोळी भाजायची आहे. निवडणुकीत राजकीय पोळी भाजण्याच्या हेतूने काही लोक वागत आहेत, असा टोला प्रवीण दरेकर यांनी लगावला आहे.

### प्रवीण दरेकरांची उद्धव ठाकरेंवर टीका

मराठा समाजाचे संघटक आज उद्धव ठाकरे यांच्या 'मातोश्री' निवासस्थानी गेले होते. तिथे जावून त्यांनी उद्धव ठाकरे यांना जाब विचारला. आमचेही हेच म्हणणे आहे की उद्धव ठाकरेंनी, शरद पवारांनी आणि काँग्रेसने आपली मराठा आरक्षणाबद्दलची भूमिका लवकरात लवकर जाहीर करणे गरजेचे आहे. केवळ बोटचेपी भूमिका घेणं योग्य नाही, अशी टीका प्रवीण दरेकर यांनी केली.

# भरधाव आयशर दुचाकी अपघातात दोघी ठार

**मंठा । प्रतिनिधी**

**मंठा ते देवी रोड वरील मंदिराजवळ असलेल्या गणेश प्रोव्हिजन दुकानासमोर आयशर क्र. चक २० एङ २८८२ मोटरसायकल धडक दिल्याने दोन जणांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना (ता.२९)सोमवार रोजी सुमारे दुपारी १:३० वा. घडली.**



वरिल विषयी वृत्त असे की, सीमा सचिन चव्हाण (वय २४) रा. वीरगव्हाण तांडा व मारिया रफिक पठाण (वय ६) रा. अहमदपूर,मंठा या दोघींचा या अपघातात जागीच मृत्यू झाला.तर इशिका सचिन चव्हाण वय ४ वर्ष व ग्रुपला रामचंद्र राठोड वय ६५ वर्ष रा.वीरगव्हाण तांडा हे दोघे गंभीर जखमी झाले असून त्यांना पुढील उपचारासाठी जालना येथे पाठवण्यात आले आहे. आयशर चालक सदरील अपघाताची माहिती न देता परस्पर फरार झाला असून सचिन भगवान चव्हाण यांच्या फिर्यादीवरून मंठा पोलीस ठाण्यात कलम १०६ (१), ३२४(२), २८१,१२५ (-) (इ) भा.न्या.सं. २०२३ सह कलम १३४/१७७ मो.वा.का.१९८८ प्रमाणे सचिन भगवान चव्हाण वय २६ वर्ष रा. विरगव्हाण तांडा याच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास सह पोलीस निरीक्षक श्री भारती हे करत असल्याची माहिती पोलीस नाईक गायके यांनी दिली.

## पान १वरून...

### गतवर्षीच्या कापूस, सोयाबीन

तर २ हेक्टरच्या मर्यादेत प्रति हेक्टरी ५ हजार रुपये या प्रमाणे अर्थसहाय्य देण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता दिली आहे. कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी एकूण १५४८ कोटी ३४ लाख रुपये इतका तर सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी २६४६ कोटी ३४ लाख रुपये असा एकूण ४१९२ कोटी ६८ लाख रुपये इतक्या निधी खर्चास मान्यता देण्यात आली आहे. महायुती सरकारने आपला शब्द पाळला आहे. या निर्णयासह तातडीने निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत.

---------------

### तुमचा स्वाभिमान जपण्याची जबाबदारी

भगवान बाबांच्या पुतळ्यावर जेसीबीतून पुष्पवृष्टीही करण्यात आली. या ठिकाणी विराट जनसमुदायासमोर नतमस्तक होत व आपल्या पदराने या जनशक्तीची दृष्ट काढत पंकजाताई मुंडे यांनी उपस्थितांशी आत्मियतेने मनमोकळा संवाद साधला. याप्रसंगी बोलताना पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की, भगवान भक्तीगडाची हीच माती आहे, जी माती कपाळी लावून इथे हा वंचितांचा गड निर्माण केला. याच मातीतून नवी उभारी घेण्याचे बळ व आशीर्वाद भगवान बाबांमुळे मला मिळाले. जीवनात ज्यावेळी कठीण प्रसंग उभे राहिले ,काय करावे ? हे सुचत नव्हते अशा वेळी भगवान बाबांनीच बुद्धी दिली आणि लेकरा माझ्या गावाकडे ये असा निरोपच जणू पाठवला. या पद्धतीने आपण सर्वजण एका रात्रीतून लक्षावधी जनशक्तीसह भगवान भक्ती गडाकडे वळलो. ही आपली ताकद आहे.

**ही लेक तुमच्यामुळेच मोठी**

पंकजा मुंडे कधीच मोठी नव्हती व कधीच मोठी असणार नाही, तुमची माझ्या पाठीशी असलेली ही एकजूट व एकसंघ जनशक्ती हीच सर्वश्रेष्ठ असून याचे ऋण कधीही फिटणार नाही. नुकतीच विधान परिषदेवर पक्षाने मला संधी दिली. सर्वांना समाधान व आनंद वाटला. परंतु व्यक्तीश: पंकजा मुंडेंना काय मिळाले तर पक्षाने मला त्यासाठी पात्र समजले व ही संधी देऊन एक प्रकारे सन्मान व स्वाभिमान दिला.ही सन्मानाची भावनाच प्रत्येकाला ऊर्जा प्रदान करणारी असते. या संधीतून वंचित, उपेक्षित घटकांना न्याय देण्याचे ध्येय आपले असून त्यासाठीच आपण राजकारणात असल्याचे पंकजाताई मुंडे यांनी सांगितले.

**तुमचा स्वाभिमान जपण्याची जबाबदारी माझी**

तुमच्या एकजुटीला वारंवार कोणाची नजर लागू नये यासाठी मला दृष्ट काढावी लागते असे म्हणत त्यांनी आपल्या पदराने उपस्थित जनसामुदायाची दृष्ट काढली. आपला उत्साह व ताकद बुद्धीने वापरावी लागेल. तुमच्या लेकीला तुमचे एक वर्ष द्या मग बघा काय घडते ते! तुमचा स्वाभिमान जपण्याची जबाबदारी माझी आहे असा शब्द मी तुम्हाला देते असं पंकजाताई मुंडे म्हणाल्या.

**एकजूट आहेच एकजीव व्हा**

आपली खरी ताकद ही आपली एकजूट आहे. कोणत्याही जाती, धर्म ,पंथ पक्ष या पलीकडे जाऊन ही एकजूट आपण कायम ठेवली पाहिजे. एकजूट तर आपण ठेवलेलीच आहे मात्र सर्व समाज घटकांना व सर्व समावेशक लोकांना सोबत घेऊन आपल्याला राजकीय वाटचाल करायची आहे. यासाठी ही एकजूट एकजीवाने आपल्याला करावी लागणार आहे. त्यामुळे एकजूट तर आहेच मात्र आपण एकजीव व्हा असं आवाहनही यावेळी पंकजाताई मुंडे यांनी केले.

------------

### बोलून दाखवण्यापेक्षा काम

रोजी होणाऱ्या मराठा समाजाच्या बैठकीत भूमिका ठरवणार असल्याचेही मनोज जरांगे पाटील म्हणाले. तर मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या या वक्तव्यावर भाजप नेत्या आणि नवनिर्वाचित बीडच्या आमदार पंकजा मुंडे यांनी सडेतोड उत्तर दिले आहे. कोणतेही काम करताना बोलून दाखवायचे नसते तर ते काम करून दाखवायचे असते असे पंकजा मुंडे यांनी म्हटले असून २८८ उमेदवार पाडणार या जरांगे पाटलांच्या इशाऱ्यावर त्यांनी सडेतोड उत्तर दिले आहे. त्यामुळे आता पंकजा मुंडे यांच्या या आव्हानाला काय उत्तर देतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

------------

### कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्यावर

(ता.२४) त्यांना दवाखान्यात दाखल करण्यात आले होते, त्यानंतर शुक्रवारी (ता.२६) त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. धनंजय मुंडे यांची प्रकृती आता स्थिर असुन, डॉक्टरांनी आणखी चार ते पाच दिवस रुग्णालयातच विश्रांती व पुढील उपचार घेण्याचा सल्ला दिला आहे. दरम्यान राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी मुंडेंच्या तब्येतीची दूरध्वनीवरून विचारपूस करत काळजी घेण्याचा सल्ला दिला आहे. तसेच भाजप नेत्या आ.पंकजाताई मुंडे यांच्यासह माजी खा.डॉ.प्रीतमताई मुंडे यांनी देखील रुग्णालयात बंधू धनंजय मुंडे यांची भेट घेऊन तब्येतीची विचारपूस केली आहे.

------------

### वस्तुस्थिती मांडून

सांगितले होते मग कालपर्यंत देवेंद्र फडणवीस गप्प का बसले? देशमुख खोटे बोलत असतील तर त्यांच्यावर कारवाई का केली नाही. फडणवीस सरकार असताना विरोधी पक्षांच्या नेत्यांचे फोन टॅप करत होते, ज्यांनी फोन टॅप केले त्या अधिकाऱ्याला पोलीस महासंचालक पदी बढती दिली आहे. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांनी निवडणुकीच्या तोंडावर विरोधकांना धमकी देण्याऐवजी वस्तुस्थिती मांडावी. एका प्रश्नाला उत्तर देताना नाना पटोले म्हणाले की, सत्ताधारी पक्षातील अनेक आमदारांना गरज नसतानाही पोलीस सुरक्षा दिलेली आहे. समित कदम हा सरकार व व्यापारी यांच्यातील मध्यस्थ व्यक्ती आहे म्हणून त्याला वाय दर्जाची सुरक्षा पुरवली आहे, ही जनतेच्या पैशाची लुट आहे. राज्यात कायदा सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला आहे, खून, दरोडे, बलात्कार वाढले आहेत, त्याकडे गृहखात्याचे व सरकारचे लक्ष नाही पण आपल्या बगलबच्च्यांसाठी पोलीस दल तैनात ठेवले असल्याचा आरोप त्यांनी केला. नवी मुंबईतील उरणमध्ये एका मुलीवर अत्याचार करून तीची निघृण हत्या करण्यात आली, ही घटना अत्यंत गंभीर आहे. राज्यात महिला असुरक्षित आहेत, मुंबई व आसपासच्या भागातच महिला सुरक्षित नाहीत तर राज्यातील इतर भागातील अवस्था काय असेल त्याचा विचार करा. राज्यातून १५ हजारांपेक्षा जास्त मुली-महिला बेपत्ता आहेत. सत्तेत गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक बसले आहेत, गुन्हेगारांना कशाचीही भिती राहिलेली नाही. उरण घटनेतील आरोपीला कठोर शिक्षा झाली पाहिजे, असेही नाना पटोले म्हणाले.

------------

### शिवसेनेसह राष्ट्रवादी काँग्रेस आमदार

अपात्रता प्रकरणाची सुनावणी ३ सप्टेंबरला होण्याची शक्यता आहे. त्याच दिवशी राष्ट्रवादी काँग्रेस आमदार अपात्रता प्रकरणाचीही सुनावणी होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणात दोन्ही बाजूंचे आमदार पात्र ठरवले होते. त्यांच्या या निर्णयाविरुद्ध शिवसेना ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात तर शिवसेना शिंदे गटाने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. त्या पाठोपाठ राष्ट्रवादी काँग्रेस आमदार अपात्रता प्रकरणातही विधानसभा अध्यक्षांनी दोन्ही बाजूच्या आमदारांना पात्र ठरवले होते. याविरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. सोमवार दि.२९ रोजी राष्ट्रवादी काँग्रेसच्या याचिकेवर सुनावणी पार पडली. या सुनावणीनंतर अजित पवारांसह त्यांच्या ४१ आमदारांना सर्वोच्च न्यायालयाने नोटीस जारी केली. यानंतर एकाच दिवशी या दोन्ही प्रकरणांची सुनावणी होणार आहे. दोन्ही सुनावण्या एकाच दिवशी होणार असल्या तरी त्या एकत्र होणार नाहीत, स्वतंत्रपणे होणार आहेत.

-----------

### दिव्यांगाना आता

यासर्व सुविधा देणारे पुनर्वसन केंद्र सर्व महानगरपालिकांनी सुरू करावे, असे निर्देश मुख्यमंत्री शिंदे यांनी सोमवारी दिले. दिव्यांगांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देणारी योजना तयार करतानाच कर्जाची रक्कम अडीच लाख रुपयांपर्यंत करण्यात यावी, असेही मुख्यमंत्री यांनी सांगितले. सह्याद्री अतिथीगृह येथे दिव्यांग कल्याण महामंडळाची बैठक झाली. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. बैठकीस उद्योगमंत्री उदय सामंत, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव विकास खारगे, दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव सुमंत भांगे, महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अभय करगुटकर आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, दिव्यांग महामंडळाला ५०० कोटी रुपयांचे भागभांडवल असून दिव्यांग बांधवांसाठी कर्ज देण्याची मर्यादा ५० हजार रुपये आहे ती वाढवून अडीच लाख रुपये करण्याचा प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देश देत त्यांना रोजगार, स्वयंरोजगासाठी कौशल्य प्रशिक्षण देणारी योजना कौशल्य विकास विभागाच्या सहकार्याने करावी जेणेकरून दिव्यांग बांधवांना रोजगाराची संधी मिळेल, असे सांगितले.

----------

### पिकांच्या हमीभावावरून

पत्रकरांना बाईट देऊ शकत नाही, असा नियम असल्याचे सांगितले. त्यावरून राहुल यांनी मला नियम माहीत नव्हता, असे सांगितले. अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा आठवडा सुरु आहे. दुसऱ्या आठवड्यात पहिल्याच दिवशी हमीभाव कायद्याचा मुद्दा विरोधकांनी चर्चेत आणला. विरोधकांनी हमीभाव कायद्याची मागणी लावून धरली. अर्थसंकल्पानंतर विरोधकांनी अर्थसंकल्पीय भाषणात शेती प्रश्नांला हात घातल्याचे पहिल्या आठवड्यात पाहायला मिळाले होते. आता दुसऱ्या आठवड्यात लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी अर्थसंकल्पावरील भाषणात सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणावर टिका केली. राहुल गांधी यांचे भाषण सुरू असताना केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन, केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह हजर होते. परंतु नरेंद्र मोदी सभागृहात हजर नव्हते. त्यावरूनही राहुल गांधी यांनी मोदीजी माझ्या भाषणाला यापुढे कधीही हजर नसतील, याची मला खात्री आहे, म्हणत मोदींनाही टोला लगावला.

---------

**टीसी हरवली आहे**

माजलगांव ते छ. संभाजीनगर प्रवासा दरम्यान कु.सुप्रिया प्रशांत चांदमारे यांचा . चा टि.सी हरवला आहे.जरी कोणाला सापडला तर तात्काळ संपर्क करा.मो.९१६८१००३०९

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार दि. ३० जुलै २०२४


## लोकअदालतीमध्ये ८८८ प्रकरणे निकाली; ६ प्रकरणात पती-पत्नीने संसार करण्याचा घेतला निर्णय

**जालना । प्रतिनिधी**

राष्ट्रीय लोक अदालतमध्ये एकुण ५ हजार ७५७ प्रलंबित प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी ५९६ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून यामध्ये एकुण १२ कोटी ५० लक्ष ४६ हजार १३२ रुपये रक्कमेची तडजोड करण्यात आली. तसेच दावा दाखल पुर्व ३० हजार ५७२ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी २९२ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून यामध्ये एकुण २ कोटी ५१ लक्ष २५ हजार २४७ रुपये रक्कमेची तडजोड करण्यात आली. कौटुंबिक न्यायालय, जालना येथील राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये एकुण ६ प्रकरणात सन्मानजनक तडजोड होवून प्रकरणे निकाली काढण्यात आली. या प्रकरणातील जोडप्यांनी परस्परांमधील वाद सामंजस्याने मिटवून घटस्फोटाचा मार्ग सोडून पुन्हा संसार करण्याचा निर्णय घेतला. तरी पक्षकारांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे सदरचे राष्ट्रीय लोकअदालतमध्ये जास्तीत जास्त प्रकरणे निकाली निघाली.

शनिवार दि. २७ जुलै २०२४ रोजी राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी निर्देशित केल्यानूसार जिल्हा व सत्र न्यायालय, जालना येथे प्रलंबित दिवाणी व फौजदारी प्रकरणे, मोटार अपघात नुकसान भरपाई प्रकरणे, तसेच धनादेश अनादर संदर्भातील प्रकरणे, विद्युत प्रकरणे, बँकेची प्रलंबित व दावा दाखलपुर्व वसूली प्रकरणे, कौटुंबिक वादाची प्रकरणे, बी.एस.एन.एल ची दावा दाखल पुर्व प्रकरणे यासाठी राष्ट्रीय लोक अदालतचे आयोजन करण्यात आले होते. या लोकअदालतसाठी जिल्ह्याच्या मुख्यालयी ८ पॅनल ठेवण्यात आले होते. त्यावर पॅनल प्रमुख म्हणुन सर्व न्यायाधीशांनी काम पाहिले तर पॅनल सदस्य म्हणून विधीज्ञांनी काम पाहिले. लोकअदालत यशस्वी करण्यासाठी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अध्यक्ष वर्षा मोहिते, जिल्हा न्यायाधीश-१ ए.जी. जोशी, व सचिव प्रणिता भारसाकडे-वाघ, तसेच सर्व न्यायाधीश, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष विकास पिसुरे, सर्व विधिज्ञ, जिल्हा सरकारी अभियोक्ता व न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी वर्तमानपत्रांना बळ मिळणे गरजेचे

## वसंत मुंडेः अमरावती येथे पत्रकार संवाद रॅलीचे जागोजाग स्वागत

अमरावती । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाची संवाद रॅली सोमवारी (दी.२९) दुपारी अमरावती येथे पोहोचली. सेवाग्राम (वर्धा) ते अमरावती दरम्यान रॅलीचे स्थानिक पत्रकारांनी जागोजाग जंगी स्वागत केले. दरम्यान अमरावती येथे झालेल्या पत्रकार परिषदेत लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी वर्तमानपत्रांना बळ मिळणे गरजेचे आहे. कारण कोरोना महामारीचा सर्वाधिक फटका वर्तमानपत्रांना बसला आहे. लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असलेली वर्तमानपत्रे कमकुवत बनत असल्याने पत्रकारांना अनंत अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेकांच्या नोकऱ्या गेल्या आहेत. या साऱ्या परिस्थितीत लोकशाहीच्या मजबुतीकरणासाठी वर्तमानपत्रांना बळ मिळणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केले.



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाची संवाद यात्रा रविवारी (दी.२८) दीक्षाभूमी येथून सेवाग्रामच्या दिशेने परवाना झाली. सेवाग्राम येथे संवाद रॅलीत सहभागी झालेल्या राज्यभरातील पत्रकारांचे स्थानिक पत्रकारांनी उत्स्फूर्त स्वागत केले. राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या सेवाग्राम येथेही रॅलीचे स्वागत झाले. दरम्यान, सोमवारी (दी.२९) सेवाग्राम येथून पत्रकार संवाद रॅली अमरावतीच्या दिशेने निघाली. वाटेत चांदुर रेल्वे येथे रॅलीचे फटाके फोडून स्वागत झाले. यानंतर बुद्ध टेकडी येथे सकाळपासून प्रतीक्षेत असलेल्या स्थानिक पत्रकारांनी प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे व पदाधिकाऱ्यांचे स्वागत आणि सत्कार केला. या ठिकाणी तथागत गौतम बुद्ध आणि महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. यानंतर अमरावती येथे पत्रकार परिषद झाली. यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या पत्रकारांना संबोधित करताना प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे म्हणाले, कोरोना महामारीचा सर्वाधिक फटका जर कोणाला बसला असेल तर तो वर्तमानपत्र आणि पत्रकारांना बसला आहे. अनेक वर्तमानपत्रांच्या आवरत्या बंद झाल्या. हजारो पत्रकारांची नोकरी गेली. कोरोना महामारी पत्रकार फ्रंट लाईनला असलेल्या पोलिस वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बरोबरीने काम करत होते. शासनाने कर्मचाऱ्यांसाठी ५० लाखाचे विभाग कवच दिले. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने पत्रकारांनाही विमा सुरक्षा देण्याची मागणी केली. सदरील मागणी मान्य ही झाली. परंतु पुढे काय झाले माहित नाही. दीडशेहून अधिक पत्रकारांचा फ्रंट लाईनला काम करत असताना मृत्यू झाला. यापैकी एकाही पत्रकाराला विमा मिळाला नाही. या साऱ्या परिस्थितीत लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असलेली लहान- मोठी सर्वच वर्तमानपत्रे सक्षम झाली पाहिजेत. वर्तमानपत्रे सक्षम झाली तर लोकशाहीचे देखील बळकटीकरण होणार आहे. वर्तमानपत्र आणि पत्रकारांना सक्षम म्हणून लोकशाहीचा चौथा स्तंभ मजबूत आणि खंबीर बनवण्यासाठीच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने संवाद रॅली काढली असल्याचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे म्हणाले.

यावेळी सरचिटणीस विश्वासराव आरोटे, प्रवीण सपकाळे, राज्य समन्वयक संतोष मानुरकर, मराठवाडा विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी तसेच स्थानिकचे पत्रकार प्रवीण शेगोकार, नयन मोंढे, अजय शृंगारे, अर्चना रक्षे, अनिरुद्ध उगले, अमित अग्रवाल, शेषनाग गजभिये, पुष्पा जैन, अली असगर दवावाला, गजानन खोपे, राजा वानखेडे, मनीष भंकाळे, मनीष गुडदे यांच्यासह स्थानिक पत्रकार उपस्थित होते.

### अधिस्वीकृतीच्या अटी शिथिल करा

पत्रकार परिषदेत बोलताना वसंत मुंडे म्हणाले, अधिकृती समितीचा विभागीय अध्यक्ष असताना मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यात कार्यशाळा घेतल्या. शहरी तसेच ग्रामीण भागातील अनेक पत्रकारांना अधिक स्वीकृती मिळवून दिली. परंतु आधी स्वीकृतीची खरी गरज ग्रामीण भागातील पत्रकारांना आहे. प्रत्येक पत्रकाराला अधिस्वीकृती मिळावी यासाठी शासनाने नियम आणि अटी येथील कराव्यात, असे वसंत मुंडे म्हणाले.

### वर्तमानपत्र वाचकांना आयकरात सूट द्या

कोरोना महामारीनंतर सर्वच वर्तमानपत्रांचा खूप कमी झाला आहे. याचा फटका वर्तमानपत्र आणि त्यामध्ये काम करणारे पत्रकार व माध्यमकर्मी यांना बसला आहे. या परिस्थितीत वर्तमानपत्र आणि पर्यायाने पत्रकारांना सक्षम करण्यासाठी वृत्तपत्र खरेदी करणाऱ्यांना प्रतिवर्षी पाच हजार रुपयांची सूट द्यावी. तसेच ग्रामीण भागातील वाचकांना आपल्या गावात पेपर वाचायला मिळावा यासाठी ग्रामपंचायतीनी वार्षिक आराखड्यात वर्तमानपत्र खरेदीसाठी दहा हजार रुपयांचा निधी राखीव ठेवावा. असे केले तरच पत्रकार सक्षम बनतील, असे वसंत मुंडे म्हणाले.

## भारतीय बौद्ध महासभेच्या तालुकाध्यक्षपदी डॉ.भागवत साळवे तर शहराध्यक्ष पदी लक्ष्मण मस्के

**माजलगाव । प्रतिनिधी**

भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखा बीड पुर्वच्या वतीन माजलगाव तालुका व शहर कार्यकारीणीची निवड करण्यासाठी दिनांक २८ जुलै सोमवार रोजी बैठकिचे आयोजन सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प येथे करण्यात आले होते या बैठकीचे अध्यक्ष





म्हणुन बीड पुर्वचे जिल्हा अध्यक्ष आद बी बी धन्वे हे होते तर सुत्रसंचलन जिल्हा सचिव डॉ एस व्ही बोबडे यांणी केले तर प्रस्ताविक संस्कार उपाध्यक्ष एस बी मोरे यांनी केले या बैठकीमध्ये भारतीय बौद्ध महासभेच्या घटने नुसार तालुक अध्यक्षपदी डॉ भागवत साळवे यांची तर शहरध्याक्ष पदी लक्ष्मण मस्के यांची निवड करण्यात आली. तालुका शाखेच्या कोषाध्यक्षपदी डी. एस साळवे तर सरचिटणीसपदी सिद्धार्थ वक्ते यांची निवड तर शहर कोषाध्यक्षपदी नासेन जावळे तर सरचिटणीपदी नंदकिशोर निसर्गंध यांची निवड करण्यात आली.या बैठकीसाठी जिल्हा महिला अध्यक्षा कमलताई डोंगरे,जिल्हा महिला सरचिटणीस शोभाताई भोजने, आद जिल्हा कोषाध्यक्ष एस.बी. शिंदे,ता संस्कार सचिव श्यामभाऊ वाघमारे,जिल्हा पर्यटन सचिव के व्ही साळवे,एन बी राजभोज,हिसोब तपासणीस एम वाय काळे,संघटक बी सी डोंगरे सह तालुक्यातील भारतीय बौद्ध महासभा बौद्धाचार्य,केंद्रीय शिक्षिक,आजी माजी पदाधिकारी,हीत चिंतक,धम्म उपासक उपासिका यांची उपस्थीत होती.

## विज्ञानाच्या प्रचार व प्रसारासाठी फिरती प्रयोगशाळा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

नेहरू विज्ञान केंद्र मुंबई आणि योगेश्वरी शिक्षण संस्था अंबाजोगाई संचलित पू.बाबासाहेब परांजपे विज्ञान केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आरोग्य स्वच्छता विज्ञानाचा प्रचार व प्रसारासाठी फिरती प्रयोगशाळा ३१ जुलै ते १५ ऑगस्ट कालावधीत असणार आहे इयत्ता पाचवी ते दहावीच्या वर्गातील विद्यार्थ्यांना याचा विज्ञान व पर्यावरण विषयातील प्रयोगाचे दिग्दर्शन प्रत्यक्ष अनुभवता येणार आहे विज्ञान संकल्पना अडचणी व प्रश्नाचे निराकरण करण्यासाठी हे विज्ञान प्रदर्शन अत्यंत उपयुक्त असून अंबाजोगाई शहर परिसर व तालुक्यातील सर्व शाळाच्या विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन योगेश्वरी शिक्षण संस्थेचे




अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर उपाध्यक्ष जी.बी. व्यास कार्यकारी उपाध्यक्ष ऍड. जगदीश चौसाळकर सचिव कमलाकर चौसाळकर कोषाध्यक्ष डॉ.शैलेश वैद्य सहसचिव भीमाशंकर शेटे व इतर पदाधिकारी आणि संचालकाच्या वतीने करण्यात आले असून या कार्यशाळेसाठी हेमंत धानोरकर ९९६००९६ ०६२

गणेश कदम ८६६८६९७८२७ या क्रमांकावर संपर्क साधावा असेही आवाहन करण्यात आले आहे.

## पान ६ वरून...

### आरटीई प्रवेश देण्यास शाळांचा

सांगितले त्यानुसार ही प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. जिल्ह्यात निवड समितीमार्फत विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत मात्र शाळांनी प्रवेश न देण्याची मनमानी भूमिका घेतल्यामुळे आधीच उशिरा प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित राहण्याची वेळ येत आहे शाळा सुरू होऊन महिना लोटला तरी या विद्यार्थ्यांना शिक्षण मिळणे दुरापास्त झाले आहे. यामुळे संतृप्त पालकांनी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी आणि गटशिक्षणाधिकारी यांना निवेदन देत आमच्या मुलांना प्रवेश न देणाऱ्या शाळांवर कठोर कारवाई करा आणि आम्हाला तात्काळ प्रवेश मिळवून द्या अशी मागणी यावेळी केली.

### २८८ पैकी ३० तिकिटे मुस्लिम

आणि शिक्षणासारख्या मुद्द्यावर प्रयतन करणारे आमदार असले पाहिजेत म्हणून महाविकास आघाडीने २८८ पैकी ३० मुस्लिम आमदार निवडून आणावें अशी मागणी कराष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्याकडे केली आहे, यावेळी शिष्टमंडळात माजी उपनगराध्यक्ष नशीम इनामदार,माजी नगरसेवक शहजाद खान,माजी नगरसेवक मसी मोमीन, रफिक कुरेशी, वजीर आतार,शब्बीर कुरेशी,शेख अझहर, बिलाल भाई, रफिक पटेल,समी सौदागर, रईस भाई,मेहबूब इनामदार,मोमीन शहेबाज, सय्यद अल्ताफ,शेख वाजे,एजाज भाई, अरसलान मसूद, यांच्यासह अनेक प्रमुख मान्यवर उपस्थित होते,

### संत संगतीत जीवनाबरोबर

कार्यक्रम होत आहेत.रविवार दि.२८ जुलै रोजी हरिकिर्तनाची सेवा सादर करताना ह.भ.प.शाम महाराज यांनी संत ज्ञानेश्वरांनी पाया रचलेला वारकरी सांप्रदाय हा विठ्ठल भक्ती व त्यातुन समाजाचे कल्याण तर संत सावतामाळी यांनी आपण संसार,कष्ट करतानाही विठ्ठल भक्ती करता येते हे दाखवुन दिले असल्याचे सांगितले.या सप्ताहात दि.३१ जुलै रोजी ह.भ.प.जगन्नाथ महाराज देशमुख,दि.०१ ऑगस्ट रोजी ह.भ.प.रामकृष्ण महाराज रंधवे,दि.०२ ऑगस्ट रोजी ह.भ.प.अर्जुन महाराज लाड,दि.०३ ऑगस्ट रोजी ह.भ.प.अच्युत महाराज दस्तापुरकर यांचे हरिकीर्तन होणार आहे.

### सिने अभिनेते सयाजी शिंदे

हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जात असला तरी सर्वात कमी वृक्षांचा देश म्हणून देखील भारत देशाची ओळख निर्माण होऊ लागली आहे. ही ओळख पुसून टाकण्यासाठी आज देशात अनेक जण पुढाकार घेताना दिसतात. याच वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन कार्यक्रमात राज्यात सिने अभिनेते सयाजी शिंदे यांचे नाव अग्रस्थानी घेतले जाते. त्यांनी राज्यात विविध ठिकाणी हजारो वृक्षांची लागवड करत त्यांचे संवर्धन देखील केले आहे. सयाजी शिंदे यांच्या सह्याद्री देवराई अंतर्गत व प्रियदर्शनी क्रीडा व सांस्कृतिक मंडळाच्या वतीने भव्य वृक्ष दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. या वृक्षदिंडीमध्ये अंबाजोगाई शहरातील विविध शाळांतील विद्यार्थ्यांना घेऊन वृक्षदिंडी निघणार आहे. या वृक्षदिंडीमध्ये सुमारे ४० हजार वृक्ष तथा वृक्षांच्या बिया देण्यात येणार आहेत. या बीजांचे बीजारोपण विद्यार्थ्यांसह प्रत्येकांनी आपापल्या घरी करावयाचे आहे. या बिजातून उगवलेल्या झाडाचे संवर्धन व संगोपन करण्यासाठी त्यांना जागरुक करण्यात येणार आहे. देशतील तसेच राज्यातील कमी वृक्षांचे परिणाम आपण सर्वजण भोगत असल्याचे सयाजी शिंदे हे आपल्या वृक्षारोपण कार्यक्रमात वेळोवेळी पटवून देत आहेत. अंबाजोगाई शहर हे प्राचीन संस्कृतीचे शहर, शिक्षणाचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. यामुळेच सयाजी शिंदे यांनी राजकिशोर मोदी यांच्या सहकार्याने अंबाजोगाई शहरात भव्य अशा वृक्षदिंडीचे आयोजन केले आहे.जागतिक पर्यावरण दिनी दि ५ ऑगस्ट रोजी सकाळी ९:३० ते दुपारी २ वाजेपर्यंत या वृक्षदिंडीचे आयोजन केले जाणार आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर सामावून घेऊन त्यांच्याशी वृक्षसंवाद साधून त्यांच्यासोबत बीजसंस्कार केले जाणार आहेत. या कार्यक्रमासाठी वृक्षमित्र तथा सिनेअभिनेते सयाजी शिंदे , सिने लेखक तथा चला हवा येऊ द्या फेम अरविंद जगताप , राजकिशोर मोदी, सह्याद्री देवराईचे जिल्हा समन्वयक कृषिभूषण शिवराम घोडके यांची प्रमुख उपस्थिती राहणार असल्याचे राजकिशोर मोदी, दिनकर जोशी, संकेत मोदी, प्रा चंद्रकांत गायकवाड, विशाल जगताप, सचिन जाधव यांच्या वतीने जाहीर केलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

### मोफत उपचार हा

बीड जिल्ह्यामध्ये जवळपास २२ खाजगी रुग्णालय आणि सात सरकारी रुग्णालय या योजनेचा लाभ देतील. आणखी काही तालुक्यांमध्ये रुग्णालयाची नियुक्ती करण्यात येणार आहे .त्यांचे प्रस्ताव आलेले आहेत. याचाही निर्णय लवकरच घेतला जाईल. रुग्णांना सेवा देताना रुग्णालयामध्ये उदासीनता असू नये अशी आपली इच्छा आहे .आम्ही स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे अपघात विमा योजना सुरू केली असून यामध्ये जवळपास एक लाख रुपयांचे मदत मिळणार आहे .त्यासाठी प्रक्रिया सुलभ करण्यात आली असून जिओ टॅगचा फोटो आणि आधार कार्ड एवढेच अपेक्षित आहे. अपघात झाल्यानंतर रुग्णांना उपचार वेळेवर मिळावेत हा त्यांचा अधिकार आहे असे त्यांनी सांगितले. आता आजारामध्ये वाढ करण्यात आली असून १३५६ आजार यात समाविष्ट करण्यात आले आहेत. यासाठी तज्ञ डॉक्टरांची समिती नेमण्यात आली आहे.या योजनेचा जास्तीत जास्त लोकांना लाभ मिळण्यासाठी आमचा प्रयत्न आहे असे यावेळी त्यांनी सांगितले. बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त रुग्णांनी या योजनेचा लाभ घ्यावा. यासाठी काही अडचणी असतील तर टोल फ्री नंबर देण्यात आला आहे. रुग्णांनी १८००२३३२२०० या नंबर वर संपर्क साधावा किंवा बीड जिल्ह्याचे समन्वयक गायकवाड यांचा मोबाईल नंबर ८२ ७५ ०९५८७४ या नंबर वर संपर्क साधावा. या ठिकाणी समस्याचे निराकरण झाले नाही तर थेट मला ९० ११ ५७ ७६ ७६ वर संपर्क साधावा आणि या योजनेचा जिल्ह्यातील जास्तीत जास्त रुग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन ओमप्रकाश शेटे यांनी यावेळी केले.

## संजीवनी हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय सेवा जीवनगौरव पुरस्कार सोहळा



**जालना । प्रतिनिधी**

श्री ज्ञान शेत्र वाटूर येथे मंठा व परतुर तालुक्यातील ज्येष्ठ डॉक्टरांचा प्रदीर्घ वैद्यकीय सेवेसाठी संजीवनी जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. हा गौरव पुरस्कार दि२८ जुलै रोजी करण्यात आला.

डॉ पीएच कुलकर्णी, डॉ विश्वास बागवे, डॉ सुनेत्रा बागवे, डॉ शेषराव बाहेकर, डॉ सुखदेव देशमुख ,डॉ व्यंकट केंदळे डॉ कुंडलिक कमळकर ,डॉ एच केशर्मा, डॉ आबासाहेब बोराडे ,डॉ अंकुश हाके ,डॉ आर एस शेख ,डॉ टाले ,डॉ बी आर मंत्री ,डॉ पोरवाल ,डॉ काबरा, डॉ दीपक जाधव, डॉ कापसे डॉ बरसाले, डॉ नारायण सरकटे ,डॉ प्रदीप कुलकर्णी ,डॉ मद्रे ,डॉ मानटे, डॉ जोगड अशा ज्येष्ठ डॉक्टरांना दीर्घ वैद्यकीय सेवेसाठी हा पुरस्कार देण्यात आला.डॉ पी एच कुलकर्णी, डॉ शेषराव बाहेकर ,डॉ विश्वास बागवे यांच्यासह सर्व ज्येष्ठ डॉक्टरांनी आपल्या जीवनातील वैद्यकीय सेवेचा अनुभव कथन करून सर्व डॉक्टरांना निस्वार्थपणे वैद्यकीय सेवा कशी देता येईल याबद्दल बहुमूल्य मार्गदर्शन केले. डॉ पुरुषोत्तम वायाळ या कार्यक्रमासाठी विशेष अतिथी होते. संजीवनी हॉस्पिटल जालनाचे संचालक डॉ बळीराम बागल डॉ कैलाश राजगुरू डॉ शिवदास मीरकड यांच्या हस्ते हे पुरस्कार देण्यात आले. या कार्यक्रमासाठी परिसरातील २०० हून अधिक डॉक्टर्स उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ रमेश सूर्य यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अमोल कदम ,योगेश जोशी गजानन गजमल, अनिरुद्ध नागवे ,विठ्ठल किंगरे, प्रशिक आदींनी परिश्रम केले.

## राष्ट्रसंत भगवानबाबांनी अनिष्ट रूढी प्रथांचे निर्मूलन केले - पो. नि. संजय लोहकरे

**परळी । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत भगवानबाबांनी अनिष्ट रूढी प्रथांचे निर्मूलन केले असे प्रतिपादन परळी शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संजय लोहकरे यांनी राष्ट्रसंत भगवानबाबा महाराज यांची १२८ वी जयंती निमित्ताने लोकनेते गोपीनाथराव मुंडे पत्रकार भवन येथे केले.परळी पत्रकार संघाच्या वतीने आयोजित चर्चासत्राचे उद्घाटकीय भाषणात ते बोलत होते .

या वेळी विचारमंचावर प्रमुख पाहुणे म्हणून लेखक ए. तू. कराड, पत्रकार धनंजय अरबुने, संपादक राजेश साबणे, संपादन आत्मलिंग शेटे, संपादक महादेव गित्ते उपस्थित होते.पुढे बोलताना संजय लोहकरे म्हणाले कि, महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. यात संत नामदेव, संत नरहरी महाराज, संत तुकाराम महाराज



,संत सावतामाळी, संत चोखामेळा, संत गाडगे महाराज, संत तुकडोजी महाराज, अशाच संतांच्या शृंखलेत बीड जिल्ह्यातील राष्ट्रसंत भगवानबाबा महाराज यांचेही सामाजिक शैक्षणिक कार्य महत्वाची भूमिका बजावली. राष्ट्रसंत भगवान बाबांनी पशुहत्या, अनिष्ट रूढी प्रथांना आळा घातला. कार्यक्रमाचे मुख्य वक्ते लेखक ए. तु कराड यांनी राष्ट्रसंत भगवानबाबा महाराज यांचे सामाजिक-शैक्षणिक विचार आणि आजचे वास्तव्य या विषयवार सखोल मार्गदर्शन केले. या परिसरात मोठ्या प्रमाणात अज्ञान, अंधश्रद्धा, सामाजिक द्वेष, विषमता व गुलामीत राहणाऱ्या लोकांना समता, स्वातंत्र्य आणि बंधुभावाने राहण्याची शिकवण कीर्तनातून दिली. समाजात मानवतावाद रुजवला. देशात महात्मा बसवेश्वर, छ. शिवाजी महाराज आणि राष्ट्रसंत भगवानबाबा महाराज यांची जयंती/ जन्मोत्सव दोन वेळेस होत असल्याचीही त्यांनी माहिती दिली. आज राष्ट्रसंत भगवानबाबांची जयंती आपण तारखे प्रमाणे साजरी करत असल्याचे ते म्हणाले. तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात दै. अतुल्य महाराष्ट्राचे संपादक नितीन ढाकणे म्हणाले कि,राष्ट्रसंत भगवान बाबांनी दऱ्या डोंगरात राहणाऱ्या समाजाला कीर्तनातून प्रबोधन केले. भगवानगडावर बहुजनांचे प्रेरणास्रोत विठ्ठल-रुक्माईच्या मूर्तीची स्थापना भगवानबाबांनी केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन भगवान साकसमुद्रे यांनी केले. सम्राट गित्ते यांनी उपस्थितांचे आभार मानले.या कार्यक्रमास जेष्ठ पत्रकार रानबा गायकवाड, संपादक बाळासाहेब फड, पोलीस विष्णू फड ,विकास वाघमारे, बाबा शेख, श्रीमंत खांडेकर, परमेश्वर मुंडे, अजय फड, हरिभाऊ आगलावे आदींची उपस्थिती होती.

## राज्य कार्याध्यक्ष वाघमारे यांच्या उपस्थितीत पिंपरीमध्ये डिजिटल मीडिया परिषदेची राज्यस्तरीय बैठक

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांच्या आदेशानुसार परिषदेशी संलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेची राज्यस्तरीय बैठक राज्य कार्याध्यक्ष अनिल वाघमारे, उपाध्यक्ष सनी शिंदे यांच्या उपस्थितीत नुकतीच पुण्यातील पिंपरी चिंचवड येथे पार पडली.या बैठकीत पुण्यात डिजिटल मीडिया परिषदेची पहिली राज्यस्तरीय कार्यशाळा होणार असून याबाबत पुणे जिल्हा पदाधिकाऱ्यांसोबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांच्या आदेशानुसार पुण्यात डिजिटल मीडिया परिषदेची राज्यस्तरीय बैठक राज्य कार्याध्यक्ष अनिल वाघमारे तसेच राज्य उपाध्यक्ष संतोष शिंदे यांच्यासह मराठी पत्रकार परिषदेचे पुणे विभागीय सचिव गणेश मोकाशी, महिला पत्रकार श्रावणी कामत, पिंपरी चिंचवड पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिल वडघुले, कार्याध्यक्ष अविनाश आदक, उपाध्यक्ष सुरज साळवे, संतोष गोतावळे,महावीर जाधव, रामकुमार शेंडगे यांच्या उपस्थितीत घेण्यात आली.

बैठकीमध्ये लंडन वरून मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांनी व्हिडिओ कॉन्फरन्स व्दारे राज्यातील पदाधिकाऱ्यांसोबत संवाद साधला. राज्यस्तरीय कार्यशाळेची रुपरेषा त्यांनी जाणुन घेत योग्य त्या सूचना दिल्या. यावेळी राज्य कार्याध्यक्ष अनिल वाघमारे म्हणाले की डिजिटल मिडिया परिषदेची पहिली राज्यस्तरीय कार्यशाळा पुण्यात होणार असून



### मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांनी व्हिडिओ कॉन्फरन्स व्दारे साधला संवाद; पुण्यात होणार पहिली राज्यस्तरीय कार्यशाळा

ही कार्यशाळा अत्यंत महत्त्वाची आहे. मराठी पत्रकार परिषदेच्या डिजिटल मिडियाच्या या विंग मध्ये यु ट्युब आणि पोर्टल चे संपादक, उपसंपादक, पत्रकार यांना सामावून घेत त्यांच्या मुलभूत प्रश्नांची सोडवणूक कशी केली जाते हे देखील समजावुन सांगण्यासाठी ही महत्त्वाची कार्यशाळा आहे. राज्यातील प्रसिद्ध तज्ञांचे मार्गदर्शन या कार्यशाळेत लाभणार आहे. यु ट्यूब व पोर्टल च्या माध्यमातून जाहिराती व आर्थिक स्थितीची माहिती या कार्यशाळेतुन मिळणार आहे. खरंतर मराठी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून मुख्य विश्वस्त एस एम देशमुख हे राज्यातील पत्रकारांच्या समस्या सोडवण्यासाठी सदैव तत्पर असतात.मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख,विश्वस्त किरण नाईक, अध्यक्ष शरद पाबळे, कार्याध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, सरचिटणीस शेख मन्सुरभाई, कोषाध्यक्ष विजय जोशी हे सर्वजण निश्चितच आपल्या सर्वांच्या हक्कांच्या मागण्यांसाठी कायम आपल्या सोबत असतात. राज्यभरातील यु ट्यूब आणि पोर्टल, चे संपादक,उपसंपादक, पत्रकार हे या राज्यस्तरीय कार्यशाळेला जास्तीत जास्त संख्येने कसे उपस्थित राहतील यासाठी महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्हा व तालुक्यांच्या नोंदी घेणे गरजेचे असल्याचे मत ही राज्य कार्याध्यक्ष अनिल वाघमारे यांनी व्यक्त केले.

तर राज्य उपाध्यक्ष संतोष शिंदे यांनी यु ट्युब आणि पोर्टल च्या संपादक, उपसंपादक व पत्रकार यांच्या अडचणीचा पाढा वाचला. यातुन अडचणीतून मुक्त होण्यासाठी मराठी पत्रकार परिषदेच्या डिजिटल मिडिया परिषदेचे दारे आपल्यासाठी सदैव खुले आहेत. डिजिटल मिडिया परिषदेचे अधिकृत आणि कायम सदस्यत्व मिळवण्यासाठी त्याचे निकष समजावून घेण्याबरोबरच आपल्या हक्काच्या मेहनतीच्या मागण्या मान्य कशा पद्धतीने केल्या जातील हेच या कार्यशाळेच्या माध्यमातून कळणार आहे. पुण्यात होणाऱ्या कार्यशाळेत डिजिटल मीडिया परिषदेची माहिती पुस्तिका असणार आहे. नियमितपणे काम करणाऱ्या पत्रकारांना अडचणीचा सामना कसा करावा लागतो. वाईट गोष्टींना आळा बसणे आणि पत्रकारांच्या सकारात्मक व नकारात्मकतेवर राज्यस्तरीय कार्यशाळेत मार्गदर्शन मिळणार असल्याचे उपाध्यक्ष संतोष शिंदे यांनी सांगितले.

cmyk

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
मंगळवार दि.३० जुलै २०२४
४

# काबुली हरभऱ्याचे दर १० हजार रुपये क्विंटल

पुणे : राज्यात काबुली हरभऱ्याचे उत्पादन यंदा बऱ्यापैकी आले आहे. उत्पादन एकरी सहा ते सात क्विंटल हाती आले होते. दर यंदा कमी अधिक झाले. सध्या आवक अल्प असून, किमान दर १० हजार रुपये प्रतिक्विंटलपेक्षा अधिक आहेत. मोठ्या काबुली (डॉलर किंवा मॅक्सिकन) हरभऱ्याची पेरणी जळगाव जिल्ह्यात अधिक म्हणजेच पाच हजार हेक्टरवर केली जाते. ही पेरणी चोपडा, यावल, रावेर भागात अधिक असते. उत्पादन यंदा बऱ्यापैकी हाती आले. अन्य हरभऱ्याच्या तुलनेत काबुलीची मळणी उशिरा म्हणजेच मार्चमध्ये सुरू झाली.



एकरी सहा ते सात क्विंटल उत्पादन मिळाले. या हरभऱ्याचे २०१९ मध्ये सर्वाधिक एकरी आठ ते नऊ क्विंटल उत्पादन मिळाले होते. मध्यंतरीदेखील उत्पादन एकरी कमाल आठ क्विंटल राहिले. यंदा मात्र उत्पादन कमी आले होते. याचे कारण म्हणजे थंडीचे दिवस कमी व ढगाळ वातावरण अधिक होते. नोव्हेंबर, डिसेंबर व जानेवारी या तीन्ही महिन्यांत एकही दिवस सलग दोन दिवस किमान तापमान पाच अंश सेल्सिअसखाली गेले नाही. तसेच या तीनही महिन्यांमध्ये पाऊस आला. १५ ते २० दिवस ढगाळ वातावरण असायचे. हरभरा पिकाला सलग थंडी हवी असते. परंतु प्रतिकूल वातावरण राहिले. मध्यम जमिनीत काबुली हरभरा पीक अधिक असते. त्याची पेरणी चोपड्यातील अनेर व तापी नदीकाठी अधिक केली जाते. या भागात सिंचन अनेकदा करावे लागते. काबुली हरभऱ्याचे दर एप्रिल ते मे अखेरिस कमी अधिक झाले. परंतु जूनच्या मध्यापासून दर टिकून आहेत.

सध्या काही शेतकऱ्यांना ११५०० रुपये प्रतिक्विंटलचा दरही मिळत आहे. गेल्या वर्षी प्रतिक्विंटल आठ ते नऊ हजार रुपये व सरासरी साडेआठ हजार रुपये दर होता. पण यंदा दर बरे राहिले. जूननंतर दरवाढ होईल, अशी अपेक्षा उत्पादकांना होती. कारण काबुली हरभरा पीक यंदा अधिक क्षेत्रात होते. यामुळे एप्रिल ते मे अखेरपर्यंत अनेकांनी विक्री टाळली. परंतु फारसा साठा या हरभऱ्याचा शेतकऱ्यांकडे नाही. या हरभऱ्यासाठी जळगाव जिल्ह्यात चोपडा, अमळनेर, धुळ्यातील शिरपूर येथील बाजार प्रसिद्ध आहे.

मध्य प्रदेश, गुजरातमधून मागणी

सध्या धुळ्यातील शिरपूर, जळगावातील चोपडा, अमळनेर, नंदुरबारातील नंदुरबार येथील बाजारात प्रतिदिन सरासरी ३०० क्विंटल काबुली हरभऱ्याची आवक होत आहे. त्यास मध्य प्रदेशातील इंदूर, गुजरातमधील बडोदा, सुरत, अहमदाबाद येथून मागणी आहे. तेथील मोठे खरेदीदार शिरपूर, चोपडा येथील बाजारात संपर्क साधून या हरभऱ्याचा पुरवठा करून घेत असून, थेट खरेदी काही खरेदीदार करून घेत आहेत, अशी माहिती मिळाली.

# ‘कांकरेज गाय’ दूध आणि शेतीकामासाठी महत्वाची



काही गायीच्या जाती एवढ्या लोभस असतात की बघताक्षणीच त्या आकर्षित करतात. अशीच गायीची एक जात म्हणजे ‘कांकरेज गाय’. दूध उत्पादन व शेतकाम अशा दुहेरी कामासाठी या जातीची गाय आणि बैल उपयुक्त ठरतो. जाणून घेऊ या जातीविषयी अधिक माहिती. या जातीच्या गायी प्रामुख्याने गुजरातच्या कच्छ रण आणि राजस्थान मध्ये मोठ्या प्रमाणात आढळतात.

शारीरिक वैशिष्ट्ये : या गायीचा रंग सिल्व्हर राखाडी किंवा स्टील राखाडी असतो. त्यांची शिंगे लांब आणि दिसायला मजबूत, तीक्ष्ण आणि वीणेच्या आकाराची असतात, जी कोणालाही सहजपणे दुखवू शकतात. या गायीची उंची सुमारे १२५ सेमी आहे, तर बैलांची उंची १५८ सेमी आहे. कांकरेज गायीचे वजन ३२० ते ३७० किलो पर्यंत असते. पूर्ण वाढ झालेल्या बैलाचे वजन ५०० ते ५५० किलो असते.

प्रजोत्पादन आणि दूध उत्पादन : या गायीचे प्रथम माजावर येण्याचे वय सुमारे ३० ते ३६ महिने एवढे असते. या गायींचा दूध देण्याचा कालावधी २७० ते ३०० दिवस असून, एका वेतात १७५० ते १८०० लिटर दूध देतात. दिवसाकाठी सर्वसाधारण ६ ते ७ लिटर दूध सहज देतात. या गायीचे सरासरी आयुष्य २० ते २२ वर्ष असते.

इतर वैशिष्ट्ये : भारतीय गायीमधील प्रथम बघताचक्षणी प्रेमात पडावे असा लोभस गोवंश म्हणजे कांकरेज गोवंश होय. ह्या गायीने त्याच्या अंगच्या गुणवत्तेने परदेशीयांना सुद्धा संशोधन करण्यास भाग पाडले आहे. आर्यांनी ज्यावेळी आक्रमण केले त्यावेळी त्यांच्या बरोबर असलेला गोवंश म्हणून या गायीची नोंद आहे. कमी पावसाच्या प्रदेशात निकृष्ट अन्नावर पोषण होऊन देखील उत्तम गुणवत्ता सिद्ध करणे हे या गायीचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. सरकारने या गायीचे महत्त्व जाणून पोस्टाचे रु. ३/- चे टपालाचे तिकीट काढले आहे.

# भारताची सीफूड निर्यात वाढली

## महाराष्ट्रातून सध्या किती सागरी खाद्यपदार्थांची निर्यात होते?

यंदा देशाच्या अर्थसंकल्पात अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी कोळंबी शेती आणि विपणनासाठी सरकार वित्तपुरवठा करणार असल्याचे सांगितल्यानंतर सरकारने कोळंबीवरील मूळ सीमाशुल्क ५ टक्क्यांवर आणले. देशात सागरी खाद्यपदार्थांची निर्यात १७.५४ लाख टनावरून आता १८.१९ लाखांपर्यंत वाढली आहे. ३.७३ टक्क्यांची वाढ नोंदवली असून महाराष्ट्रातून तब्बल १ लाख ७० हजार ७५ टनांची निर्यात होत असल्याचे नुकतेच वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने सांगितले.

मालवाहतूकीचा खर्च वाढल्याची नोंद : यंदा सागरी खाद्यपदार्थांच्या निर्यातीसाठी मालवाहतूकीच्या खर्चात अनेक उद्योगांनी वाढ नोंदवली आहे. केप ऑफ गुड होपमार्गे भारतातून जहाजे घेऊन जाणाऱ्या सीफूड कंटेनरची युद्धनौका वळवण्यात आल्या आहेत. त्यामुळे निर्यात सुरु असल्याचे सांगण्यात येत आहे. महाराष्ट्राला ७२० किमीचा सागरी किनारा लाभला असून सागरी खाद्यपदार्थांची निर्यात वाढल्याचे वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने सांगितले.

निर्यात बाजारातील अनेक आव्हानांवर मात करून भारताच्या सीफूड निर्यातीने आतापर्यंतचा निर्यात उच्चांक गाठला आहे. भारताला ८,११ किमी पेक्षा जास्त



समुद्रकिनारा लाभला आहे ज्यामुळे भारतातील सर्वोच्च सीफूड निर्यातदारांची वाढ झाली आहे. तर महाराष्ट्राला ७२० किमीचा सागरी किनारा लाभला असून सागरी खाद्यपदार्थांची निर्यात वाढल्याचे वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने सांगितले.

भारतीय नौदलाचे निर्यातीवर लक्ष : भारतीय नौदलाने उत्तर अरबी समुद्रात सागरी पाळत ठेवण्याचे प्रयत्न लक्षणीय वाढले असून लांब पल्ल्याच्या सागरी गस्ती वाढवण्यात आल्या आहेत.सीफूड निर्यातीवर सरकारचे लक्ष असून या निर्यातीत वाढ झाल्याचे सांगण्यात आले आहे.

भारतातून सीफूडची मागणी कुठे? : दरवर्षी भारतीय सीफूड उद्योग जगभरात सुमारे १३.७७.२४४ टन सीफूड निर्यात करतो. भारतीय सीफूडची प्राथमिक निर्यात ठिकाणे आशिया, मध्य पूर्व, यूएसए, यूके, चीन आणि युरोपीय देश आहेत. महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, तामिळनाडू, आंध्र प्रदेश, केरळ आणि गुजरात ही भारतातील प्रमुख सीफूड उत्पादक राज्ये आहेत. सीफूड निर्यात उद्योग देशाच्या अर्थव्यवस्थेत सुमारे ४०% योगदान देतो. यंदाच्या अर्थसंकल्पातील घोषणेमुळे चा स्टॉक ९.२७ टक्क्यांनी वाढला, ८.१५ टक्क्यांनी, ७.५५ टक्क्यांनी वाढला, ७.५१ टक्क्यांनी आणि वॉटरबेस वर ५.५१ टक्क्यांनी वाढला.

# मान्य मागण्यांचे लेखी आश्वासन द्या, दूध उत्पादक शेतकऱ्यांची मागणी

## दुग्ध आयुक्तांसोबतच्या बैठकीत काय घडलं?

दुधाला प्रति लिटर ४० रुपये भाव मिळाला पाहिजे या प्रमुख मागणीसाठी दूध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीच्या वतीनं अहमदनगर () जिल्ह्यातील कोतुळ इथं २१ दिवसापासून धरणे आंदोलन सुरु आहे. कोतुळ ते संगमनेर भव्य ट्रॅक्टर रॅली काढून आंदोलकांनी आपला रोष व्यक्त केला आहे. या पार्श्वभूमीवर काल (२६ जुलै २०२४) राज्याचे दुग्ध आयुक्त विकास मोहोळ यांच्या प्रमुख उपस्थितीत संगमनेर प्रांत कार्यालय या ठिकाणी आंदोलक प्रतिनिधी यांच्यासोबत मागण्यांवर चर्चा करण्यासाठी बैठक संपन्न झाली. यावेळी मागण्यांचे निवेदन दुग्ध आयुक्त व संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले आहे. याबाबत मान्य केलेल्या मागण्यांचे लेखी येत्या दोन दिवसांमध्ये प्रशासनाच्या वतीने आंदोलकांना देण्यात येईल असे सांगण्यात आले आहे. मात्र, मान्य मागण्यांचे लेखी आल्यानंतरच आंदोलनाबाबत निर्णय घेऊ असे दुग्ध आयुक्तांना सांगितल्याची माहिती किसान सभेचे नेचे डॉ. अजित नवलेंनी सांगितले.



राज्यात सध्या २० लाख लिटर दूध अतिरिक्त आहे. येत्या काळात फ्लश सीजन सुरु झाल्यानंतर यामध्ये आणखीन किमान १० ते १५ लाख लिटर दुधाची वाढ होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर आज मिळत असलेला दर सुद्धा आगामी काळात मिळणार नाही, अशी रास्त भीती आंदोलकांनी बैठकीत व्यक्त केली आहे. सरकारने तात्पुरता इलाज म्हणून दुधाला प्रति लिटर पाच रुपयाचे अनुदान दिले आहे. मात्र हा उपाय आगामी काळात कुचकामी ठरणार असून दुधाचे उत्पादन फ्लश सीजनमध्ये अधिक वाढले, तर कंपन्या आज देत आहेत त्यापेक्षा सुद्धा आणखीन कमी दर देतील व दुधाचे भाव २२ रुपयापर्यंत खाली कोसळतील अशी रास्त भीती आंदोलकांच्या वतीने बैठकीत व्यक्त करण्यात आली. असे होऊ नये व दुधाला किमान ४० रुपये दर मिळावा यासाठी शासन करत असलेल्या उपाययोजनांची माहिती यावेळी आंदोलकांच्या वतीने विचारण्यात आल्याचे अजित नवले म्हणाले.

राज्यातील वीस लाख लिटर दूध राज्याबाहेरील दूध संघांना हाताळण्यासाठी देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्याचबरोबर दूध पावडरला अनुदान देण्यात आले आहे. दूध पावडर पोषण आहारामध्ये वितरित करण्याचेही नियोजन सरकार करत आहे असे उत्तर या पार्श्वभूमीवर देण्यात आले. राज्य सरकारने अनुदान व उपरोक्त सांगितलेल्या उपायांबरोबरच किमान २० लाख लिटर दूध स्वतः खरेदी करावे, त्याची पावडर बनवावी व ही पावडर पोषण आहारामध्ये गरीब व गरजू कुटुंबांना वितरित करावी अशी मागणी यावेळी आंदोलकांच्या वतीने करण्यात आली. राज्यात दूध भेसळीचा प्रश्न अत्यंत गंभीर असून तातडीने याबद्दल कठोर उपाययोजना करण्याचा आग्रह आंदोलकांच्या वतीने लावून धरण्यात आला. पशुखाद्याचे दर कमी करण्यासाठी व पशुखाद्याची गुणवत्ता सुधारण्यासाठी धोरण घेण्याची आवश्यकता बैठकीत अधोरेखित करण्यात आली. पशुवैद्यकीय दवाखान्यांची अवस्था अत्यंत वाईट असून पशुवैद्यकीय रिक्त जागांची भरती करावी, शासकीय पातळीवर औषधे उपलब्ध करून देऊन दुधाचा उत्पादन खर्च कमी करावा, आदी मागण्या ही आंदोलकांच्या वतीने यावेळी मांडण्यात आल्या.

अनुदान वाटपामध्ये अनेक दूध कंपन्यांनी १ जुलै ते १० जुलै या दसवड्याचे पेमेंट ३० ऐवजी २७ रुपयांनी केले आहे. याबाबत अत्यंत गांभीर्याने मुद्दे मांडण्यात आले आहेत. असे करणाऱ्या कंपन्यांवर कठोर कारवाई करु व त्यांना ३० रुपये प्रति लिटर दर द्यायला भाग पाडू असे आश्वासन यावेळी दुग्ध आयुक्त विकास मोहोळ यांनी दिले.मार्च २०२४ पासून जुलै २०२४ दरम्यान सरकारने कोणतेही अनुदान दिले नाही. या काळात सुद्धा दूध उत्पादक अडचणीतच होते. त्यामुळे या काळातील अनुदान सुद्धा दूध उत्पादकांना द्यावे. तसेच ३.२/ ८.३ गुणवत्तेच्या आतील दुधाचा डिडक्शन दर हा अनेक संघांनी १ रुपया केला असल्यामुळे राज्यातील ३३ टक्के दुधाला यामुळं अनुदान योजना जाहीर होण्यापूर्वी होता त्यापेक्षाही कमी दर मिळत आहे, ही गंभीर बाब आंदोलकांच्या वतीने आक्रमकपणाने लावून धरण्यात आली. तातडीने याबाबत कारवाई करून ३.२/८.३ गुणवत्तेच्या आतील दुधाला सुद्धा डिडक्शन दर ३० पैसे लागू करावा व अशा दुधालाही अनुदान द्यावे अशी मागणी ही यावेळी करण्यात आली. मिल्को मिटर व वजन काटामारी बद्दलही यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली व उपाययोजनांबाबत ठोस आश्वासन घेण्यात आले. यावेळी मागण्यांचे निवेदन यावेळी दुग्ध आयुक्त व संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले आहे. याबाबत मान्य केलेल्या मागण्यांचे लेखी येत्या दोन दिवसांमध्ये प्रशासनाच्या वतीने आंदोलकांना देण्यात येईल. लेखी मान्य करण्यात आलेल्या मागण्यांच्या प्रकाशामध्ये आंदोलनाची पुढील दिशा ठरवणार असून आंदोलन तोवर सुरूच ठेवण्याचा संकल्प यावेळी आंदोलकांच्या वतीने करण्यात आला आहे.




### जागतिक दिवस: आंतरराष्ट्रीय फ्रेंडशिप डे

### महत्वाच्या घटना

७६२ : खलिफा अल मन्सूरने बगदाद शहराची स्थापना केली.
१६२९ : इटलीतील नेपल्स शहरात झालेल्या भूकंपात सुमारे १०,००० जण मृत्यूमुखी पडले.
१८३६ : अमेरिकेतील हवाई या शहरात पहिला इंग्रजी भाषिक वृत्तपत्र प्रकाशित झाले.
१८९८ : विल्यम केलॉग याने 'कॉर्नफ्लेक्स' विकसित केले.
१९०९ : अमेरिकन वैमानिक व शास्त्रज्ञ राईट बंधू यांनी सैन्यांसाठी पहिले विमान तयार केले.
१९३० : पहिला फुटबॉल विश्वचषक उरुग्वेने जिंकला.
१९६२ : 'ट्रान्स कॅनडा हायवे' हा सुमारे ८,०३० किमी लांबीचा जगातील सर्वात मोठा राष्ट्रीय महामार्ग सुरू झाला.
१९६६ : इंग्लंड च्या फुटबॉल संघाने पहिल्यांदा विश्वकप जिंकला.
१९७१ : अपोलो १५ चंद्रावर उतरले.
१९९७ : गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांना 'राजीव गांधी राष्ट्रीय सद्भावना पुरस्कार' जाहीर
२००० : चंदन तस्कर वीरप्पनने अभिनेते डॉ. राजकुमार यांचे अपहरण केले.
२००० : कोणत्याही प्रवासी वाहनातून एखादा प्रवासी अपघाताने खाली पडून त्याचा मृत्यू झाल्यास त्याबद्दल त्या वाहनचालकाला जबाबदार धरता येणार नाही, असा सर्वोच्च न्यायालयाचा निकाल
२००१ : राजस्थानातील अलवर येथील राजेंद्रसिंह यांना रॅमन मॅगसेसे पुरस्कार जाहीर. छोटे बंधारे बांधून पाणी साठवण्याबाबत त्यांनी लोकसहभागातून मोठे काम केले आहे.
२०१२ : दिल्लीतील पावर ग्रिड खराब झाल्यामुळे उत्तर भारतील ३० कोटी पेक्षा जास्त लोकांची वीज खंडित झाली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१८ : एमिली ब्रॉंट इंग्लिश लेखिका (मृत्यू: १९ डिसेंबर १८४८)
१८५५ : जॉर्ज विलहेम फॉन सिमेन्स जर्मन उद्योगपती (मृत्यू: १४ आक्टोबर १९१९)
१८६३ : हेन्री फोर्ड फोर्ड मोटर कंपनीचे संस्थापक (मृत्यू: ७ एप्रिल १९४७)
१८८६ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय महिला चिकित्सक व समाजसुधारक मुथुलक्ष्मी रेड्डी यांचा जन्मदिन.
१९२३ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित सुप्रसिद्ध भारतीय इतिहासकार, संस्कृतज्ञ व सौंदर्यशास्त्री गोविंदचंद्र पांडे यांचा जन्मदिन.
१९२८ : साली पद्मश्री पुरस्कार व महाराष्ट्र भूषण पुरस्कार सन्मानित सुप्रसिद्ध भारतीय मराठी व हिंदी चित्रपट अभिनेत्री सुलोचना लाटकर यांचा जन्मदिन.
१९४५ : सेवानिवृत्त भारतीय नागरी सेवक व भारताचे माजी १६ वे मुख्य निवडणूक आयुक्त आणि लेखक नवीन चावला यांचा जन्मदिन.
१९४७ : अर्नोल्ड श्वार्झनेगर जन्माने ऑस्ट्रियन असलेले अमेरिकन शरीरसौष्ठवपटू, अभिनेते आणि कॅलिफोर्नियाचे ३८ वे राज्यपाल
१९५१ : भारतीय-इंग्रजी चित्रकार आणि मूर्तिकार गॅरी यहूदा यांचा जन्म.
१९६२ : भारतीय दहशतवादी यकब मेमन यांचा जन्म. (मृत्यू: ३० जुलै १९६२)
१९८० : इंग्लिश क्रिकेट खेळाडू जेम्स अँडरसन यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६२२ : संत तुलसीदास यांनी देहत्याग केले.
१७१८ : पेनसिल्व्हेनियाचे स्थापक विल्यम पेन यांचे निधन.
१७७१ : अठराव्या शतकातील प्रसिद्ध इंग्रजी कवी, पत्र-लेखक व शास्त्रीय अभ्यासक थॉमस ग्रे यांचे निधन.
१८९८ : ऑटो फॉन बिस्मार्क जर्मनीचा पहिला चॅन्सेलर (जन्म: १ एप्रिल १८१५)
१९३० : बार्सिलोना फुटबॉल क्लब चे स्थापक जोन गॅम्पर यांचे निधन. (जन्म: २२ नोव्हेंबर १८७७)
१९४७ : ऑस्ट्रेलियाचे वे६ पंतप्रधान जोसेफ कूक यांचे निधन.
१९६० : 'कर्नाटक सिंह' गंगाधर बाळकृष्ण देशपांडे स्वातंत्र्यसैनिक (जन्म: ३१ मार्च १८७१)
१९८३ : वसंतराव देशपांडे शास्त्रीय व नाट्यसंगीत गायक (२ मे १९२०)
१९९४ : शंकर पाटील साहित्यिक, चित्रपट कथालेखक, ग्रामीण कथालेखक, भारतीय चित्रपट महामंडळाचे संस्थापक सचिव आणि 'बालभारती'चे संपादक. त्यांचे 'चोरा मी वंदिले', 'सागराचे पाणी', 'सवाल', 'बाजिंदा' हे कथासंग्रह तसेच 'सरपंच', 'इशारा', 'घुंगरू', 'कुलवंती', 'बेईमान', 'ललाट रेषा', 'सुन माझी सावित्री' या कादंबर्या हे गाजलेले साहित्य आहे. (जन्म: ८ ऑगस्ट १९२६)
१९९५ : डॉ. विनायक महादेव तथा 'वि. म.' दांडेकर अर्थतज्ञ, 'इंडियन स्कूल ऑफ पॉलिटिकल इकॉनॉमी' या संस्थेची त्यांनी उभारणी केली. त्यांचे 'पॉव्हर्टी इन इंडिया' हे पुस्तक गाजले (जन्म: ६ जुलै १९२०)
१९९७ : व्हिएतनामचा राजा बाओडाई यांचे निधन.
२००७ : स्विडिश चित्रपट दिग्दर्शक इंगमार बर्गमन यांचे निधन.
२००७ : इटालियन चित्रपट दिग्दर्शक मिकेलांजेलो अँतोनियोनी यांचे निधन.
२०११ : डॉ. अशोक रानडे संगीत समीक्षक (जन्म: २५ आक्टोबर १९३७)
२०१३ : भारतीय-इंग्रजी लेखक, कवी आणि नाटककार बेंजामिन वॉकर यांचे निधन. (जन्म: २५ नोव्हेंबर १९१३)

cmyk

# तब्बल ५५ लाख रुपये खर्चून ऊसतोड मजुरांनी लोकवर्गणीतून जिल्हा परिषद शाळा बांधली

## आता शिक्षकांची सोय पण आम्हीच करायची का? पोखरी (घाट) ग्रामस्थांचा सवाल

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पोखरी (घाट) येथील ऊसतोड मजूर, शेतमजुर ग्रामस्थांनी आपल्या हातातील कोयता मुलांच्या हाती पडु नये म्हणून लेकरांच्या उज्वल भविष्यासाठी पोटाला चिमटा घेऊन कष्टाच्या पैशातुन लोकवर्गणीतून तब्बल ५५ लाख रुपये खर्चून जिल्हा परिषद शाळेसाठी टोलेजंग इमारत बांधली.मात्र गेल्या सहा महिन्यांपासून शिक्षकांची पदे रिक्त असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असुन वारंवार लेखी निवेदनाद्वारे शिक्षकांची मागणी करूनही शिक्षक मिळत नसल्याने लोकवर्गणीतून जिल्हा परिषद शाळा बांधली आता शिक्षक सुद्धा आम्हीच द्यायचे का?? असा संतप्त सवाल पोखरी (घाट) ग्रामस्थांनी केला आहे.

पोखरी (घाट) येथे जिल्हा परीषदेची १ ली ते ८ वी पर्यंत शाळा आहे.विद्यार्थी पटसंख्या १५९ आहे.शाळेत फक्त ५ शिक्षक आहेत. शिक्षण विभागाला वारंवार विनंती करूनही शिक्षक मिळत नाही त्यामुळे अखेर शिक्षकांची रिक्त पदे न भरल्यास शाळेला कुलूप लाऊन



शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्या कार्यालयात शाळा भरवु असे लेखी निवेदन महिनाभरापूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद बीड, गटशिक्षणाधिकारी यांना दिले आहे. गावातील ऊसतोड मजूर, शेतमजूर, शेतकरी यांनी लोकवर्गणीतून तब्बल ५५ लाख रुपये खर्चून शाळा बांधली पण शाळेत शिक्षक कमी पडत असल्याने लेकरांचं नुकसान होतंय,शाळा गाववाल्यांनी बांधली आता शिक्षक पण आम्हीच द्यायचे का?? असा संतप्त सवाल सविता शहाजी फाळके यांनी केला आहे. बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ३५० शाळांमधील ५९२ वर्गखोल्या धोकादायक आहेत तर २०५ वस्तीशाळा ईमारतीविना किरायाने, समाज मंदिरात, पारावर, झाडाखाली तर जनावरांच्या गोठ्यात भरतात.धारूर तालुक्यातील २५ शाळांमध्ये मुलांना शिकवायला शिक्षकच नाहीत तर गेवराई तालुक्यातील पौळाची वाडी येथील ग्रामस्थांनी शिक्षकांची मागणी करत शाळेला कुलूप ठोकले.तर काही ग्रामस्थांनी शिक्षकांच्या मागणीसाठी शिक्षणाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात शाळा भरवण्याचा लेखी इशारा जिल्हा प्रशासनाला दिला आहे.मात्र शिक्षण विभागाच्या अनागोंदी कारभारामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.जिल्हा प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

# पिंपळनेर शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप



पिंपळनेर । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पिंपळनेर येथील जिल्हा परिषद कन्या शाळेत माजी पालकमंत्री आ. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त माजी प.स.सदस्य राजेश गवळी यांच्या वतीने गरजू विद्यार्थिनींना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

शैक्षणिक साहित्य वाटपाच्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक दिलीप डावकर तर प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक कैलास पेंढारे, पत्रकार अशोक होळकर, प्रदीप आनेराव, अजय रत्नपारखी सह आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष दिलीप डावकर व प्रमुख मान्यवरांच्या हस्ते यावेळी पेन, वही व इतर शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना मुख्याध्यापक डावकर म्हणाले की वाढदिवस किंवा उत्सव यावर होणारा व्यर्थ खर्च सत्कारणी लागावा यासाठी गरीब व गरजू विद्यार्थ्यांना मदत करण्यात यावी व शाळेला सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी केले. यानंतर इतर मान्यवरांनी ही मनोगत व्यक्त करत गरीब विद्यार्थ्यांना मदत करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमास माऊली आनेराव, भागवत कदम, भागवत ठोकरे, रावण यादव, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गेवराई तालुक्यात कायदा वेशीला टांगला?

## त्वरिता देवी गडावर कसलाही परवाना न घेता चक्क कंपनी गत बांधकाम



तलवाडा। प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथे श्रीक्षेत्र त्वरिता देवी तीर्थक्षेत्र आहे या ठिकाणी राज्यभरातून लोक दर्शनासाठी येतात यात देवीला गडावर मंदिराला ब दर्जा प्राप्त झालेला असून ट्रस्टच्या दुर्लक्षपणामुळे भाविक भक्तांना मोठा त्रास सहन करावा लागत असून डोंगरावरती कोणी कुठेही आणि कसेही दुकाने लावत असून एकाने तर चक्क महसूल च्या हद्दीत असलेली डोंगर माथ्यावरच जिल्हाधिकारी साहेब यांचे परवानगी न घेताच कंपनीगत बांधकाम केले असून २५ ते ३० लाख रुपये किमतीची जागा हडप केली असून याकडे साध कुणीही लक्ष दिले नाही यामुळे कंपनी गत बांधकाम करणाऱ्या बांधकाम होईपर्यंत कोणी हटकलं सुद्धा नाही यामुळे ट्रस्ट विरोधात संतापाची लाट निर्माण झाली असून उलट सुलट चर्चेला उधान आले असून महसूल विभागाने तर चक्क याकडे दुर्लक्ष केले असून कुठे दाळ शिस्ती की काय? असा प्रश्न ग्रामस्थ करत असून याकडे जिल्हाधिकारी यांनी लक्ष घालण्याची मागणी होत आहे

याबाबत सविस्तर माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील तलवाडा या ठिकाणी सर्व जाती धर्मातील लोक गुण्यागोविंदाने राहतात तलवाडा या गावाची ओळख जागृत देवस्थान आई त्वरिता देवी चे गाव म्हणून राज्यभरात ओळख निर्माण झालेली आहे या ठिकाणी नवस फेडण्यासाठी भाविक भक्त तलवाडा या ठिकाणी दाखल होतात देवीच्या मंदिरावरती कसल्याच प्रकारचे शिस्त नसताना भाविक भक्तांना मोठा त्रास सहन करावा लागत असतो देवी ट्रस्टच्या मालकी हक्कात असलेले महसूलच्या हद्दीत येत असल्यामुळे कोणी कुठेही जागा धरत असून आडमाप बांधकामे करत असून लाखो रुपयाची जागा धरण्यासाठी उधळपट्टी करून कंपनी गत बांधकाम करत आहेत आश्चर्याची गोष्ट म्हणजे या ठिकाणी गडावरती नियोजन लावण्यासाठी देवी ट्रस्टचे मंडळ असून मंडळाला नियोजन करण्यात सपशेल अपयश आले आहे काही व्यक्तींनी देवी गडावर कसलाही बांधकाम परवाना न घेता एवढेच नाही तर व्यवसायासाठी दुकान बांधकाम करण्यासाठी जिल्हा अधिकारी यांचा परवाना असावा लागतो त्यानंतर शासकीय प्रोसिजर तयार करून मंजुरी भेटते या ठिकाणी कायद्याला केराची टोपली दाखवत लाखो रुपयाची जागा हडप करून त्या ठिकाणी पक्के बांधकाम करून कंपनी गत व्यवसाय करून त्याच ठिकाणी राहण्यासाठी देखील व्यवस्था करून कुणी कुठेही आणि कसेही जागा पकडून आलिशान बांधकाम करत असताना दिसून येत आहे याकडे तहसील प्रशासनाचे साप दुर्लक्ष होत असून गावकऱ्यातून या बद्दल उलट सुलट चर्चा होत असून जिल्हाधिकारी साहेब यांनी लक्ष देऊन कारवाई करण्याची मागणी भाविक भक्तातून होत आहे.

# सततचा पाऊस व सुर्यप्रकाशाअभावी खरीपाची पिके वाया

## पंचनामे करुन शासन,विमा कंपनीकडून भरपाई द्या-भाई विष्णुपंत घोलप

पाटोदा । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात २०२४-२५ च्या खरीप हंगामाची पेरणी जुनचा दुसरा पंधरवाडा आणि जुलैच्या पहिल्या आठवड्यात जवळपास पुर्ण झाल्या आहेत. त्यानंतर सतत गेल्या २० दिवसापासुन म्हणजे जवळपास तीन आठवडे सतत काही ठिकाणी रिमझीम तर काही ठिकाणी मोठा पाऊस पडला खरीपाचे पिक उगवल्यानंतर मागील १५ ते २० दिवस बीड जिल्ह्यात सुर्यदर्शन झाले नाही त्यामुळे पिकाची वाढ खुंटली,काही ठिकाणी पाणी जास्त झाल्यामुळे पिकाची मुळे सडली तसेच पिक पिवळी पडली आणि पिकावर रोगराई वाढली त्यामुळे बीड जिल्ह्यातील बहुसंख्य शेतकऱ्यांना ह्या नुकसानीचा फटका बसला असुन त्या शेतकऱ्यांना शासनाने तात्काळ आर्थिक मदत करणे गरजेचे आहे.



त्यासाठी जिल्हाधिकारी साहेबांनी तात्काळ कृषीविभाग,महसुल आणि विमा कंपनी यांना पंचनाम्याचे आदेश देऊन शेतकऱ्यांना संकटातुन वाचवावे. ई-पीक पाहणीचे सर्व्हर हे १ ऑगस्ट पासून सुरु होणार आहे असे प्रशासनाच्या वतीने मागिल काही दिवसापुर्वी शेतकऱ्यांना कळविले आहे. उदा. नुकसानीसाठी पाटोदा तालुक्याच्या सर्वच भागात खरीप पिकाचे नुकसान झालेले असुन आपण प्रशासनाला पंचनाम्याचे तात्काळ आदेश दिल्यास बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या खरीप पिकाच्या नुकसानीचा अंदाज येईल असे लेखी निवेदनाव्दारे उपविभागीय अधिकारी कार्यालय पाटोदा मार्फत जिल्हाधिकारी बीड यांना भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप यांनी कळविले आहे. माहितीस्तव राज्याचे कृषी मंत्री तथा बीड जिल्हा पालकमंत्री मुंडे साहेब व शेकापचे सरचिटणीस आ.भाई जयंत पाटील आणि बीड जिल्ह्याचे खासदास मा.बजरंग(बप्पा) सोनवणे यांना दिले आहे.

# अमेरिकेतील अभ्यास दौरा संपवून डॉ. मिलिंद आवाड मातृभूमीत

माजलगाव । प्रतिनिधी

मानवी हक्क अभियान या राज्यव्यापी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे प्राध्यापक डॉ. मिलिंद एकनाथ आवाड हे एक महिन्यापूर्वी अमेरिकेत विशेष अभ्यास दौऱ्यावर होते.

जे. एन. यु. दिल्ली चे प्राध्यापक डॉ. मिलिंद एकनाथ आवाड हे देशातील वंचित, भूमिहीन, शेतमजूर, गायरान अतिक्रमण धारक, सुशिक्षित बेकार, बालमजूर, अन्यायग्रस्त पीडित, अन्याय अत्याचार प्रतिबंध, वर्णवाद, जातीयभेद व साक्षर भारत सह विविध विषयाला घेऊन इथल्या वंचित वर्गाचा आवाज म्हणून अमेरिकेत विशेष दौऱ्यावर जाऊन तिथं भारतातील विविध समस्यावर विशेष अभ्यास दौरा करून, काल डॉ. मिलिंद आवाड हे आपल्या मातृभूमीत दाखल झाले. यावेळी इथल्या



वंचिताचा आवाज सातासमुद्रापलीकडे बुलंद केल्याने व माय भूमीत सुखरूप परातल्याने काल ता २८ रोजी शहरातील संभाजी महाराज चौकातील हॉटेल सुखसागर प्रांगणात भारतीय कॉंग्रेस अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांच्या सह मानवी हक्क अभियान व समाज बांधवांच्या वतीने गुलाब पुष्पहार घालून हृदयपूर्वक सत्कार करून सन्मान करण्यात आला. यावेळी भारतीय कॉंग्रेस अनु. जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे, शेकापचे भाई ऍड.नारायण गोले,प्रल्हाद दळवी,रमेश जाधव,अनंत घडसिंगे,सुधाकर कांबळे, श्रीमंत कांबळे, लखन कांबळे, शरद लोखंडे, अभिमन्यू वाघमारे, संदीप वाघमारे संजय वाघमारे सह सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

# प्रस्थापितांच्या दडपशाहिच्या राजकारणाला कंटाळून भोगगावचे तरुण भाजपात



घनसावंगी । प्रतिनिधी

घनसावंगी तालुक्यातील भोगगाव येथील असंख्य युवकांनी आपल्या गावच्या रखडलेल्या विकासासाठी प्रस्थापितांच्या दडपशाहिच्या राजकारणाला कंटाळून आज भाजपात प्रवेश केला. घाटगे साहेबांमुळे आम्ही जागरूक झाले असून आता आम्ही दडपशाहीचे राजकारण संपवू असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. शाखा अध्यक्ष राजेंद्र मुळे(तालुका कोषाध्यक्ष) , बूथ प्रमुख सचिन मुळे, भारत मुळे, ईश्वर मुळे अमित जाधव,व धीरज मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व युवकांनी सतीश घाटगे यांच्या हस्ते पक्ष प्रवेश केला.सर्व युवकांचे सतीश घाटगे यांनी पक्षात स्वागत करून सत्कार केला. त्यांच्या अडचणी जाणून घेऊन त्या सोडविण्याचा शब्द दिला. तसेच लवकरच या युवकांमधील शिक्षिताना रोजगार देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सतीश घाटगे यांनी सांगितले. यावेळी विष्णू जाधव, विकास वाघमारे, भीमराव आवटे, रंगनाथ जंगले, बालाजी कचरे ,बाबासाहेब पंडूरे, प्रदीप सोनवणे, अमीर पठाण, सुमित तूपसौंदर, राहुल तूपसौंदर, योगेश कचरे, राहुल खरात, अनिरुद्ध खरात, किरण विठोरे , विकास बर्डे,अंगद साबळे, , यांनी प्रवेश केला.

# २०२० चे पीक विमा प्रकरण : उच्च न्यायालयाकडून विमा कंपनी व राज्य सरकारला नोटीस

परळी । प्रतिनिधी

सन २०२० च्या खरीप हंगामात शेवटच्या काळात झालेल्या अतिवृष्टीमुळे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले.कापणीला आलेले पीक निसर्गाच्या लहरीपणामुळे हातचे निघून गेले.शेतकऱ्यांनी ७२ तासाच्या आत पीक विमा कंपनीकडे तक्रार न केल्याने विमा कंपनीने हजारो शेतकऱ्यांना पीक विमा नाकारला.याबाबत अखिल भारतीय किसान सभा बीड जिल्हा कमिटीने हा मुद्द्यावर तालुका प्रशासन ते न्यायालयापर्यंत लढाई लढविली.याबाबत मा.उच्च न्यायालय मुबंई यांनी याची दखल घेत ॲग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनीला दि ८ ऑगस्ट २४ रोजी उच्च न्यायालयात उपस्थित राहण्याची नोटीस बजावली आहे.

बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी सन २०२० खरीप हंगामाकरिता प्रधानमंत्री पीकविमा योजनेत ॲग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनीकडे शेतकऱ्यांचा, राज्य व केंद्र शासनाचा हिस्सा म्हणून देशात विक्रमी ७९८ कोटी एवढा पीकविमा हप्ता भरुन जवळपास २५०० कोटींची विमा रक्कम संरक्षित केली. वास्तवात मात्र खरीप हंगामाच्या शेवटी सातत्याने कोसळना-या अतिवृष्टीमुळे सर्वच पिकांचे सर्वदूर मोठे नुकसान होऊनही विमा कंपनीने बीड जिल्ह्यातील विविध महसूल मंडळातल्या

## बीड जिल्हा किसान सभेच्या लढ्यास यश

केवळ १९ हजार ३४४ इतक्या शेतकऱ्यांना १२ कोटी १९ लाख एवढ्या तुटपुंज्या रकमेचा पीकविमा वाटप केला. उर्वरित ७७५ कोटी रुपयापेक्षा जास्त रक्कम स्वतः च्या घशात घालण्यासाठी शेतकऱ्यांनी नुकसानीच्या ७२ तासांच्या आत आमच्याकडे भरपाई मागीतली नाही ही पळवाट शोधून बाकीच्या शेतकऱ्यांचे नुकसान होऊनही त्यांना हक्काच्या पीकविम्यापासून वंचित ठेवले.सातत्याने कोसळनारा पाऊस,रोजच्या रोज वाढीव होणारे पीक नुकसान, तांत्रिक बाबी संदर्भातील अज्ञान, नैराश्य व नुकसानाची व्यापकता पाहता शासनस्तरावर सरसकट पीक पंचनाम्याची होणारी मागणी लक्षात घेऊन झालेल्या पीक नुकसानी संदर्भात ७२ तासाच्या आत तक्रार नोंदवणे शेतकऱ्यांकडून राहून गेले. पण शासनाने केलेल्या पीक पंचनाम्यानुसार ४ लाख ३२ हजार शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याचा अहवाल दिला.

शासनाने केलेले हे पीकपंचनामे विमा कंपनीने ग्राह्य धरून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट पीकविमा द्यावा ही मागणी घेऊन



बीड जिल्हा किसान सभेचे जिल्हाध्यक्ष कॉ.एड.अजय बुरांडे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी रस्त्यावर उतरली होती.या मागणी करिता जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी तहसीलदार, जिल्हाधिकारी कार्यालय, राज्य कृषी आयुक्तालय, तत्कालीन कृषिमंत्री व सध्याचे कृषिमंत्री यांची भेट घेऊन प्रश्नाचे गांभीर्य लक्षात आणून देण्याचा प्रयत्न केला होता.जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींना निवेदन देऊन भेटी घेऊन प्रश्नाचे गांभीर्य लक्षात आणून देण्याचा प्रयत्न केला होता. कोविड १९ संसर्गजन्य आजाराचा निर्बंधाचा काळ लक्षात घेऊन ७२ तासाच्या आत नुकसानीची पूर्वसूचना देणारी अट शिथिल करावी यासाठी उंबरटे जवले होते. मात्र मागणी रास्त असूनही रस्त्यावरच्या लढाईत व लोकप्रतिनिंकडून न्याय न मिळाल्यामुळे शेवटी संवैधानिक मार्गाने या संदर्भातली दाद जनहित याचिकेच्या माध्यमातून किसान सभेकडून एड.अनिल गायकवाड यांच्या मार्फत मा.उच्च न्यायालयात मागण्यात आली होती. त्या अनुषंगाने मा.मुख्य न्यायमूर्ती देवेंद्रकुमार उपाध्याय व न्यायमूर्ती किशोर सी.संत यांच्या मुबंई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने या याचिकेची दखल घेऊन या संदर्भात दि ८ ऑगस्ट २०२४ रोजी न्यायालयात उपस्थित राहून विमा कंपनी व महाराष्ट्र शासनास नोटीस बजावली आहे. त्यामुळे विमा कंपनीने घशात घातलेला हजारो कोटीचा विमा बीड जिल्ह्यातील विमाधारक नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मिळण्याची आशा किसानसभेच्या लढवय्यापण्यामुळे निर्माण झाली आहे.

उच्च न्यायालयाने शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न असलेल्या सन २०२० खरीप पीक विमा बाबत संविधानिक मार्गाने लढत बीड जिल्हा किसान सभेकडून मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती.मा.उच्च न्यायालयाने किसान सभेची याचिका मान्य करत ॲग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनी व महाराष्ट्र शासन यांना दि ८ ऑगस्ट २०२४ रोजी न्यायालयात उपस्थित राहण्याची नोटीस बजावली आहे.मा.उच्च न्यायालयाकडून शेतकऱ्यांच्या पदरात योग्य न्याय मिळेल अशी आशा आहे.

कॉ.एड.अजय बुरांड

# प्रत्येक किशोरवयीन मुलीस वयात आल्याबाबतची माहिती असणे अत्यावश्यक -प्राचार्य शेटे

बीड । प्रतिनिधी

येथील यशवंत विद्यालयातील किशोरींसमोर वयात येताना या विषयावर व्याख्यान देत असताना प्राचार्य डॉ.सविता शेटे ,राज्य कार्यवाह, विवेकवाहिनी, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती यांनी ''प्रत्येक किशोरवयीन मुलीस वयात येताना बाबतची शास्त्रीय माहिती असणे अत्यावश्यक आहे ''असे प्रतिपादन केले. र.धो. कर्वे यांनी लैंगिक शिक्षणावर केलेले काम, त्यांनी १५ जुलै १९२७ रोजी सुरू केलेले समाजस्वास्थ्य मासिक या निमित्ताने महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने राज्यभर जुलै महिन्यात लैंगिकता प्रबोधन कार्यक्रम आयोजित केले आहेत. याच अनुषंगाने महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा बीड च्या वतीने आयोजित ''वयात येताना'' या विषयावर प्राचार्य डॉ सविता शेटे यांनी यशवंत विद्यालय बीड येथे किशोरवयीन मुलींसमोर व्याख्यान दिले.

या प्रसंगी त्यांनी या बाबतची संपूर्ण शास्त्रीय माहिती दिली.वयात येणे म्हणजे नेमकी काय प्रक्रिया होते ? शरीरात स्त्रवणारे स्त्राव, त्यामुळे मुलींच्या शरीरात होणारे शारीरिक बदल,भावनिक बदल, त्यामागील शास्त्रीय कारणे, मासिक पाळी ,त्याची प्रक्रिया, त्यामागील विज्ञान, मासिक पाळी विषयीचे अज्ञान, गैरसमज, अंधश्रद्धा ,गर्भधारणा यावर सविस्तर माहिती दिली. तसेच या काळात किशोरीनी घ्यायची काळजी ,समतोल आणि पौष्टिक आहार,विश्रांती ,व्यायाम, स्वच्छ्ता,याची सखोल माहिती देवून मासिक पाळीचे व्यवस्थापन कसे करावे यावर मांडणी केली. मासिक पाळी कोणत्याही दृष्टीने अपवित्र नसून ती पूर्णतः नैसर्गिक प्रक्रिया आहे आणि अपत्य प्राप्तीसाठी असणारी पूर्वअट आहे.हे प्रत्येक मुलीस आणि महिलेस माहित असणे खूप आवश्यक आहे. अन्यथा चुकीच्या किंवा अशास्त्रीय माहिती मधून अनेक गैरसमज आणि अंधश्रद्धा वाढीला लागतात. वाईट घटना घडतात.याचा परिणाम मुलींच्या एकूण वाढ आणि विकासाच्या प्रक्रियेवर होतो. मुलींचे हे वय फुलण्याचे असते. त्यामुळे किशोरींसह शिक्षक आणि पालकांनीही खबरदारी घेणे गरजेचे आहे. या व्याख्यानाच्या वेळी मुलींनी अनेक प्रश्न विचारले ,यापूर्वी आम्हाला याची माहिती नव्हती, अजून माहिती द्यावी अशी मुलींची मागणी होती.यावरून या विषयाचे गांभीर्य लक्षात घेणे आवश्यक आहे,असे डॉ सविता शेटे यांनी सांगितले. याप्रसंगी यशवंत विद्यालयाचे मुख्याध्यापक गणेश वाघ उपस्थित होते. शाळेतील विद्यार्थिनी आणि शिक्षिका यांनी या कार्यक्रमास उस्फुर्त प्रतिसाद दिला.

# पोखरी ते पोखरी तांडा रस्ता न करताच गुत्तेदाराने उचलले बिल

## ग्रामस्थांची तक्रार, चौकशी करून कारवाई करण्याची मागणी

**घाटसावळी । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील पोखरी (मैंदा)तांडा ते पोखरी असा दिड कि.मी.रस्ता सन २०२२/२३ ला ५ लक्ष रूपये रस्ता सुधार साठी मिळाले गुत्तेदार व इंजिनिअर यांनी संगनमताने काम न करता थातुरमातुर करून चांगल्या रस्त्याची वाट लावली असून नागरीकांना चिखलातून रस्ता काढत दिड किलोमीटर पायपीट करावी लागत आहे.सदरील बोगस कामाची चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याची मागणी जिल्हा अधिकारी, कार्यकारी अभियंता बांधकाम, तहसीलदार, पोलिस अधीक्षक यांना तक्रारी द्वारा दिली असुन चौकशी करून दोषींवर कारवाई





न केल्यास ५ ऑगस्ट रोजी पोखरी फाटा येथे रस्ता रोको चा इशारा दिला आहे.

पोखरी ते पोखरी तांडा हा दिड किलोमीटर कच्च्या रस्ता असुन त्यांच्या मागणी मुळे सन २०२२/२३ ला या रस्त्याच्या कामासाठी ५ लक्ष रूपये निधी उपलब्ध झाला.गुत्तेदार व शाखा अभियंता यांनी संगनमताने थोडीफार डागडुजी केली मुरूम कम मातीच रस्त्यावर टाकली व नियमाप्रमाणे कामं न करता बोगस बील उचलले.रिमझीम पावसाने रस्त्यावर नुस्ता चिखल झाला असुन कुठलच वाहन चालत नसल्याने तांड्यांवरील लोकांना चिखलातून पायपीट करावी लागत आहे.आज पोखरी ग्रामस्थांची गुत्तेदार व शाखा अभियंता यांच्या विरोधात या बोगस कामाची तक्रार जिल्हा अधिकारी, कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग, तहसीलदार बीड, पोलिस अधीक्षक यांना लेखी दिली असून सदरील कामाची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.तसेच पोखरी तांडा येथील नागरीकांच्या रस्ताचा प्रश्नः तात्काळ मार्गी लावा अन्यथा समस्त गावकरी पोखरी फाटा येथे दिनांक ५ ऑगस्ट रोजी सकाळी रास्तारोको आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

# आरटीई प्रवेश देण्यास शाळांचा नाकार

## प्रवेश नाकारणाऱ्या शाळांवर कारवाई करून मान्यता रद्द करा – मनोज जाधव

**बीड । प्रतिनिधी**

शासनाने न्यायालयाच्या आदेशा नंतर आरटीई प्रवेश देण्यास सुरुवात केली आहे. जिल्ह्यामध्ये २ हजार २६ विद्यार्थ्यांची निवड आरटीई प्रवेशासाठी झाली असून यात ४७१ प्रवेश निश्चित झाले आहेत. मात्र जिल्ह्यातील काही शाळा प्रवेश देण्यास नकार देत असल्यामुळे आरटीई प्रवेश मिळून देखील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली आहे. शाळांना तंबी देत प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्याची जबाबदारी शिक्षण विभागाची असताना शिक्षण विभाग बघायची भूमिका घेत असून यामुळे पालक हवालदिल झाला आहे. आज सर्व पालक एकत्र येत जिल्हा परिषद येथे मोठी घोषणाबाजी करत आमच्या मुलांना न्याय द्या, आमच्या मुलांना प्रवेश द्या, या घोषणा देत शिक्षणाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निवेदन सादर केले. यावेळी न्यायालयाच्या आदेशाने आणि




### जिल्ह्यातील २ हजार विद्यार्थी राहणार शिक्षणापासून वंचित

### पालक आक्रमक ;जिल्ह्याच्या मिनी मंत्रालयात घोषणाबाजी
### शिक्षण विभागाची हाताची घडी तोंडावर बोट

### न्यायालयाचा आदेश आणि कायद्या नुसार शाळा आणि प्रशासनाला आरटीई प्रवेश द्यावेच लागणार – मनोज जाधव

कायद्याने शाळा आणि प्रशासनाला आरटीई प्रवेश द्यावेच लागतील, जर का शाळा प्रवेश देणार नसतील तर आरटीई कायद्यानुसार त्या शाळेंवर कारवाई करून त्यांची मान्यता रद्द करण्यात यावी अशी मागणी शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी केली यावेळी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत दुर्बल व वंचित घटकातील मुलांसाठी स्वयं अर्थसहाय्य शाळांमध्ये २५ टक्के कोटा हा मोफत प्रवेशासाठी राखीव ठेवण्याची तरतूद आहे. या प्रवेश प्रक्रिये संदर्भात राज्य सरकारने नवीन नियम करत नियमबाह्य अध्यादेश काढला यामुळे ही प्रक्रिया रखडली आणि न्यायप्रविष्ट झाली यात उच्च न्यायालयाने पालकांच्या बाजूने निकाल देत जुन्या पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबवत आरटीई प्रवेश देणे सरकार आणि शाळांना अनिवार्य असल्याचे ◀◀ पान ३ वर

# विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण



### दानशुरांच्या मदतीतून मानवलोकचा उपक्रम

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या मानवलोक सेवाभावी संस्थेच्या वतीने हालाखीच्या परिस्थितीत शिक्षण घेण्याऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. यावेळी डॉ.अनिल भुतडा,डॉ.हनुमंत चाफेकर,डॉ.मनिषा भुतडा,कल्पना लोहिया नायब तहसिलदार मिलींद गायकवाड, पत्रकार राहूल देशपांडे, प्रशांत बर्दापुरकर,अरूण आसरडोहकर,शाम सरवदे आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

मानवलोक संस्था सामाजिक कार्यासाठी ओळखली जाते हाल अपेष्टात जीवन जगण्याऱ्यांसाठी ही संस्था आधार असल्याचे पाहुण्यांनी मनोगतातून व्यक्त केले. यावेळी उपस्थितांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. संजना आपेट, सावित्री सागरे यांनी प्रारंभी स्वागत गायिले.उपस्थितांचे स्वागत जनसहयोगच्या वतीने करण्यात आले.प्रास्तविक कल्पना लोहिया यांनी केले तर संचालन शाम सरवदे यांनी करून आभार मानले.कार्यक्रमासाठी बालाजी शेरेकर, दिलीप मारवाड, श्रेया गायकवाड, विद्या गिरी, सायली पटाईत आदी उपस्थित होते.

# बीडमध्ये शुक्रवारी होणार भव्य स्वयंरोजगार मेळावा

## ना.अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त स्तुत्य उपक्रम; डॉ.क्षीरसागर दाम्पत्य तरुणांना उपलब्ध करून देणार रोजगार

**बीड । प्रतिनिधी**

बीड विधानसभा मतदारसंघामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी राबविला जात आहे. पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्या संकल्पनेतून बीडमध्ये शुक्रवारी (दि.२) भव्य स्वयंरोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यातून अनेकांना रोजगार उपलब्ध होणार आहे.

ना.अजितदादा पवार, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून नुकतेच आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. यापाठोपाठ आता स्वयंरोजगार मेळावा होत आहे. बीड







### बँक अधिकारी, महामंडळ व्यवस्थापकांसोबत बैठक

बीडमध्ये होणाऱ्या स्वयंरोजगार मेळाव्याच्या अनुषंगाने शासकीय विश्रामगृहावर जिल्हा अग्रणी बँक अधिकारी, जिल्हा उद्योग केंद्राचे महा व्यवस्थापक, सर्व बँकांचे अधिकारी, विविध महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक, अधिकारी यांच्यासमवेत डॉ.योगेश क्षीरसागर यांची बैठक पार पडली. यावेळी स्वयंरोजगार मेळाव्यासाठी सर्वोतपरी सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही अधिकाऱ्यांनी दिली.

मतदारसंघात व्यवसाय करू इच्छिणाऱ्या तरुणांसाठी ही सुवर्णसंधी आहे. या मेळाव्यातून फास्ट फूड, इडली-डोसा विक्री केंद्र, भाजीपाला विक्री, पर्यटन आदी व्यवसायांसाठी ८० ते ९५ टक्के बँक कर्ज उपलब्ध होऊ शकते. यात सबसिडी किंवा व्याज परतावा मिळणार आहे. काही व्यवसायांवर १५ ते ३५ टक्के सबसिडीचा लाभ मिळणार आहे. यासाठी बँकांसह विविध महामंडळे सर्वोतपरी सहकार्य करणार आहेत. दरम्यान, हा स्वयंरोजगार मेळावा शहरातील सौ.के.एस.के. महाविद्यालयात शुक्रवारी (दि.२) सकाळी १० ते ५ या वेळेत होणार आहे. या दिवसापर्यंत अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत. अर्जासाठी व अधिक माहितीसाठी ८२०८९०७७५१, ९९२३८४७६६०, ७३५३०३६१११ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच, बीड विधानसभा मतदारसंघातील तरुणांनी स्वयंरोजगार मेळाव्याचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी केले आहे.

# फेसबुक पोस्टवरून एकास मारहाण

**परळी । प्रतिनिधी**

परळी येथून तुळजापूरकडे निघालेल्या मराठा समाजातील युवकांच्या रॅलीत सहभागी होण्यासाठी निघालेल्या युवकास फेसबुक पोष्ट का टाकतो असे म्हणत मारहाण केल्याची घटना परळी शहरात घडली.

पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार मनोज जरांगे पाटील यांची तब्येत चांगली राहावी तसेच त्यांना दीर्घायुष्य लाभावे यासाठी परळी येथून काही युवक रॅली द्वारे तुळजापुरकडे वाद्य वाजवत निघाले.या रॅलीत सहभागी होण्यासाठी शहरातील अजय देशमुख (रा.शंकरपार्वती नगर) यास ज्ञानेश्वर मुंडे व ओंकार फड या दोघांनी अडवून लाथाबुक्यांनी मारहाण केली. या घटनेची माहिती मिळताच परळी शहरातील सकल मराठा समाजाच्या तरुणांनी काही काळ परळी-अंबाजोगाई मार्गावर ठिय्या आंदोलन केले.दरम्यान या प्रकरणी अजय देशमुख यांच्या फिर्यादीवरून शहर पोलीस ठाण्यात गुरन ११६/२०२४ कलम १२६(२), १८९(२), ११८(१), १९१(२), १९०, ११५(२), ३५२, ३५१(२) भारतीय न्यास संहिता व कलम १३५ भारतीय पोलीस अधिनियम अनव्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेतील आरोपीस जोपर्यंत अटक होत नाही तोपर्यंत आम्ही रस्त्यावरून उठणार नाहीत असा पवित्रा या युवकांनी घेतला.दरम्यान कोणताही तणाव वाढू नये यासाठी घटनास्थळी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.या प्रकरणाचा अधिक तपास ठाण्याचे अधिकारी योगेश शिंदे हे करत आहेत.

# २८८ पैकी ३० तिकिटे मुस्लिम समाजाला द्या–खुर्शीद आलम

## जयंत पाटील यांच्या मार्फत शरद पवार व मा.वि.आ.कडे मागणी

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका निमित्त राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील बीडच्या दौऱ्यावर आले होते यावेळी शहराध्यक्ष तथा माजी सभापती खुर्शीद आलम यांच्या नेतृत्वात मुस्लिम समाजाचे एक शिष्टमंडळाने जयंत पाटील यांची भेट घेतली, जयंत पाटील यांच्या सोबत सविस्तर चर्चा करून महाराष्ट्र विधानसभेतील २८८पैकी ३० तिकिटे मुस्लिम समाजाला देऊन त्यांना बळ देऊन निवडून आणावे अशी मागणी केली आहे, मुस्लिम समाजाच्या शिष्टमंडळाच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड शहराध्यक्ष



खुर्शीद आलम नाम यांनी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्याशी सविस्तर चर्चा करताना म्हणाले की महाराष्ट्रात बहुसंख्य मुस्लिम समाज राष्ट्रवादी आणि महा विकास आघाडीच्या सोबत होता, आहेत आणि रहाणार आहेत, पण त्यांना विधानसभेत प्रतिनिधित्व नसल्यामुळे विधानसभेत त्यांची बाजु मांडणार कोणीही नाही, मुस्लिम संरक्षण, आरक्षण, ◀◀ पान ३ वर

# संत संगतीत जीवनाबरोबर समाजाचे कल्याण होते– ह.भ.प.शाम महाराज



**परळी । प्रतिनिधी**

संत संगतीमुळे व्यक्तीगत जीवनासह समाजाचे कल्याण होते.यामुळे संसाराचा वेल सांभाळून संतांच्या सानिध्यात रहावे असे आवाहन ह.भ.प.शाम महाराज उखळीकर यांनी केले.संत शिरोमणी सावता महाराज समाधी सोहळ्यानिमीत्त परळी येथील संत सावता महाराज मंदिरात रविवार दि.२८ जुलै पासुन ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ झाला.यानिमीत्त रात्री ७ ते १० या वेळेत शाम महाराजांचे हरिकीर्तन पार पडले.

संत सावता महाराज समाधी सोहळ्यानिमीत्त परळी येथील संत सावतामाळी मंदिरात सुरु असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात पहाटे ४ ते ६ काकडा भजन,७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण,११ ते १ गाथा भजन,२ ते ४ श्री संत सावता महाराज चरित्र,५ ते ६ धुपारती,रात्री ७ ते ९ हरिकीर्तन, १० ते १२ जागर असे ◀◀ पान ३ वर

# मोफत उपचार हा रुग्णांचा अधिकार –ओमप्रकाश शेटे

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील साडेबारा कोटी लोकांना मोफत आरोग्यसेवा पुरवण्यात येणार असून आयुष्मान भारत या योजनेतून रुग्णांना मोफत आणि वेळेवर उपचार मिळणे हा त्यांचा अधिकार असल्याचे प्रतिपादन आयुष्मान भारतचे समन्वयक ओमप्रकाश शेटे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना केले. यावेळी सहाय्यक जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर चव्हाण, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर विलास गंडाळ, माहिती अधिकारी अंजू निमसरकर, जिल्हा समन्वयक गायकवाड आदींची उपस्थिती होती. जिल्हाधिकारी कार्यालयात



### महाराष्ट्रातील साडेबारा कोटी लोकांना आरोग्य सेवा देणार

झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये बोलताना ओम प्रकाश शेटे म्हणाले की जे रुग्ण कुठल्या योजनेत बसत नाहीत. त्यांना सी.एस.आर.फंडातून मदत करण्याचा आमचा प्रयत्न असतो .बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त लोकांना या योजनेचा लाभ मिळावा अशी आपली अपेक्षा आहे. आता शासनाने पिवळे, केसरी आणि पांढरे अशा सर्व रेशन कार्ड वर पाच लाखापर्यंत आरोग्य सेवा देण्याचा निर्णय घेतला आहे. या संदर्भात जास्तीत जास्त लोकांना लाभ देण्यासाठी स्थानिक यंत्रणेने सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी केले. ◀◀ पान ३ वर

# सिने अभिनेते सयाजी शिंदे व सुप्रसिद्ध सिनेलेखक अरविंद जगताप यांच्या उपस्थितीत वृक्षारोपण व भव्य वृक्षदिंडी


## सयाजी शिंदे करणार विद्यार्थ्यांसोबत वृक्षसंवाद व बीजसंस्कार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त प्रियदर्शनी क्रीडा व सांस्कृतिक मंडळ व सह्याद्री देवराई यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सुप्रसिद्ध सिनेअभिनेते तथा वृक्षमित्र सयाजी शिंदे त्याचबरोबर सुप्रसिद्ध सिने लेखक अरविंद जगताप यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये जागतिक पर्यावरण दिनी म्हणजेच दि ५ ऑगस्ट रोजी अंबाजोगाई शहरात भव्य अशा वृक्षदिंडीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती प्रियदर्शनी क्रीडा




व सांस्कृतिक मंडळाचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे देण्यात आली आहे.पर्यावरण दिनानिमित्त





सिनेअभिनेते सयाजी शिंदे हे शहरातील विद्यार्थ्यांसोबत वृक्षसंवाद साधत विद्यार्थ्यांवर बीजसंस्कार करत विविध वृक्षांची ओळख त्यांना करुन देणार आहेत.आज देशात ३३% जंगलाची आवश्यकता असतांना केवळ ३%जंगल किंवा वृक्ष आहेत त्यामुळेच निसर्गात ग्लोबल वॉर्मिंग होऊन पर्जन्यमान मोठया प्रमाणावर घटले असल्याचे प्रसिद्धी पत्रकात राजकिशोर मोदी यांनी सांगितले. वृक्ष वाढले तरच निसर्गाचा समतोल राखला जाईल. जल ही जीवन हें यामुळे सर्वांनी वृक्षारोपण करावे तसेच अंबाजोगाई शहरातील सर्व शाळा,महाविद्यालये,स्वयंसेवी संस्था यांनी सहभागी व्हावे असे अवाहन देखील राजकिशोर मोदी यांनी केले. भारत देश ◀◀ पान ३ वर

# होमगार्ड सेवेसाठी ऑनलाईन अर्ज करावेत

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्हा होमगार्डमधील विविध पथकांच्या रिक्त असलेल्या एकुण १९५ जागेवर नवीन होमगार्ड सदस्य नोंदणीचे आयोजन करण्यात आले आहे. होमगार्ड नोंदणीचे माहितीपत्रक, नियम व अटी https://maharashtracdhg.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. होमगार्डसाठी अर्ज करण्यासाठी उमेदवार कमीत कमी दहावी उत्तीर्ण, वर्ष २० ते ५० वयोमर्यादा, पुरुष १६२ से.मी. तर महिलांसाठी १५० से.मी. उंची असणे आवश्यक आहे. उमेदवारास विहीत केलेल्या वेळेत धावणे व गोळाफेकीची शारिरीक चाचणी द्यावी लागेल. तरी जिल्ह्यातील होमगार्डमध्ये सेवा करण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांनी दि.१७ ऑगस्ट २०२४ पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा समादेशक तथा अपर पोलिस अधिक्षक आयुष नोपाणी यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# शिवसेनेच्या वतीने वृक्षारोपणासह शालेय साहित्याचे वाटप



**मंठा । प्रतिनिधी**

शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त तळणी येथील केंद्रीय प्राथमिक शाळा येथे शालेय विद्यार्थ्यांना शिवसेना व युवासेनेच्या वतीने वही- पेन वाटप आणि वृक्षारोपण उपक्रम आयोजित करण्यात करण्यात आला होता. यावेळी शिवसेनेचे उपतालुकाप्रमुख ज्ञानेश्वर माऊली सरकटे, युवासेना उपतालुका प्रमुख आवेश पठाण, संदीप सरकटे, संतोष सरकटे, अशोक सरकटे, कल्याण सरकटे, भागवत कंबळकर, ज्ञानेश्वर येऊल, बाळासाहेब सरकटे, सुखदेव हनवते, गजानन पातळे,विठ्ठल कंबळकर, साबेर शेख, अनिकेत देशमुख, ऋषी देशमुख, अमोल सरकटे,तनवीर पठाण, ओमकार सरकटे, ओम हानवते, गजानन सरकटे,आकाश गुडघे,आकाश हनवते, राहुल भारस्कर, अभिषेक सोनुने, सिध्दांत सरकटे,जुनेद बागवान, शाहिद बागवान, शुभम कंबळकर यशवंत कंबळकर यांची उपस्थिती होती.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

मंगळवार दि.३० जुलै २०२४ । पान ७

# गॅलरीतून जम्प कर, गेममधील टास्क पूर्ण करण्यासाठी १० वीतील मुलाने संपवलं जीवन!

**पुणे । प्रतिनिधी**

सोशल मीडिया आणि स्मार्टफोनच्या जमान्यात लहान मुलं, शालेय मुलंही मोबाईलच्या अधीन झाली आहेत. मोबाईलवर रिल्स पाहणं, गेमिंगच्या नादी लागणं हा काहींचा नित्यक्रम बनला आहे. मुलांचं हे व्यसन सोडविण्यासाठी कुटुंबीयांकडूनही प्रयत्न केले जातात. अनेकदा, समुपदेशनच्या माध्यमातून ह्या मुलांना या गेमिंच्या झोनमधून बाहेर काढण्याचा प्रयत्न कुटुंबीयांकडून केला जातो. तर, कधी-कधी दाब देऊन, रागावून, भीती दाखवूनही आई-वडिल आपल्या मुलांना या गेमिंग व मोबाईलच्या वेडापासून दूर करण्याचा प्रयत्न करत असतात. मात्र, पिंपरी चिंचवडमध्ये एक धक्कादायक घटना घडली आहे. एका गेमच्या नादात चक्क १४ व्या मजल्यावरुन १० वीच्या विद्यार्थ्याने उडी घेतली. या घटनेनं पिंपरी चिंचवड हादरुन गेलं आहे.

काही वर्षांपूर्वी पोकेमॅन, पब्जी यांसारख्या गेममध्ये शालेय मुलं वेडी झाल्याचं दिसून आलं होतं. आजही तीच परिस्थिती काही ठिकाणी दिसून येते. पिंपरी चिंचवडमध्ये दहावीत शिकणाऱ्या मोबाईल गेमचं व्यसन जडलं. या व्यसनाच्या आहारी तो इतका गेला की, त्याला इमारतीच्या चौदाव्या मजल्यावरून उडी मारण्याचा टास्क मिळाला. विशेष म्हणजे या मुलाने तो टास्क फॉलो केला. यातच या मुलाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या मृत्यूच्या घटनेनंतर पोलिसांनी घराची तपासणी केली असता, एका कागदावर मुलाने गेममधील टास्क लिहल्याचे पाहायला मिळाले. त्यातूनच, त्याने गेमिंच्या झोनमध्ये स्वत:चं जीवन संपवल्याचं उघडकीस आलं आहे. पिंपरी चिंचवडच्या किवळे भागात ही घटना घडली आहे. २६ जुलैची रात्र या मुलासाठी अखेरची ठरली. गेल्या सहा महिन्यांपासून हा मुलगा गेमच्या आहारी गेला होता. त्यानंतर तो स्वतःला बेडरूममध्ये तीन-तीन तास कोंडून घेत असे. खोलीत एकटाच बडबड करत असायचा. आजवर घाबरणारा मुलगा थेट किचनमधील चाकूची मागणी करायला लागला होता.

वेगवेगळे टास्क त्याला येऊ लागले, जे तो फॉलो करत गेला. हा बदल पाहून आई-वडील ही चिंतेत होते. अतिवृष्टीमुळं २५ जुलैला शाळांना सुट्टी होती, तो ही दिवस त्याने गेम खेळण्यातचं घालवला. मग रात्री अनेक विनवण्या केल्यानंतर तो जेवणासाठी बाहेर पडला. मात्र, जेवण केल्यावर पुन्हा तो खोलीतचं जाऊन बसला. आई दुसऱ्या मुलाला ताप आल्यानं त्या चिंतेत होती. रात्रीचा एक वाजला मुलाचा ताप काय उतरेना, त्यामुळं आई जागीचं होती. त्याचवेळी सोसायटीच्या व्हाट्सएपवर एक मुल जखमी अवस्थेत खाली पडल्याचा मेसेज आला. तो मेसेज मुलाच्या आईने वाचला अन् तिला थोडी कुणकुण लागली. मग ती खोलीच्या दिशेने गेली, खोली आतून बंद होती. दुसरी चावी घेऊन खोली उघडली पण मुलगा आत नव्हता, त्यानंतर धावाधाव करत ती जखमी अवस्थेत पडलेल्या मुलाजवळ पोहचली, बघते तर काय? तो तीचाच मुलगा होता.

गॅलरीतून जम्प कर, टास्कचा कागद सापडला

रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या पोटच्या लेकाला पाहून, आईची पायाखालची जमीनचं सरकली. मुलाला उपचारासाठी हॉस्पिटलमध्ये नेण्यात आलं, पण तोपर्यंत खूप उशीर झाला होता. घरात गेममधील कोडिंगच्या भाषेत लिहिलेली अनेक कागदं आढळली. त्यावर घराचं स्केच होतं आणि गॅलरीतून जम्प कर, असा टास्क ही नमूद होता. जो त्याने फॉलो करत १४व्या मजल्यावरून उडी घेत संपवला. मोबाईल गेमच्या आहारी गेलेल्या मुलांसाठी आणि त्याकडे कानाडोळा करणाऱ्या पालकांसाठी ही अतिशय चिंतेची बाब आहे. या घटनेतून ते धडा घेतील आणि अशा धक्कादायक घटनेची पुनरावृत्ती होणार नाही. याची ते आत्ताच तातडीनं खबरदारी घेतील, अशी अपेक्षा आहे. तसेच, सरकारने अशा गेमिंग वर कायमस्वरूपी बंदी आणावी अशी मागणी ही आत्महत्या करणाऱ्या मुलाच्या आई-वडिलांनी बोलताना केली आहे.

# नदीपात्रातील २०० डंपर राडारोडा महापालिकेने काढला

**पुणे । प्रतिनिधी**



राजाराम पुलापासून ते शिवण्यापर्यंत अनेक ठिकाणी नदीच्या कडेने खासगी जागा मालकांनी हजारो ट्रक राडारोडा टाकून नदीपात्र कमी केले आहे. त्याचा फटका सिंहगड रस्त्यावरील एकता नगरी भागातील नागरिकांना बसला आहे. त्यामुळे महापालिकेने नदीपात्रात टाकलेला राडारोडा काढण्याचे काम सुरु केले आहे. आज दिवसभरात सुमारे २०० ट्रक राडारोडा काढल्याचा दावा प्रशासनाने केला आहे.

खडकवासला धरणातून ३५ हजार ५५६ क्यूसेस पाण्याचा विसर्ग करण्यात आल्यानंतर वारजे, सिंहगड रस्ता, पुलाची वाडी, येरवडा, खिलारे वस्ती आदी भागात पाणी घुसले. सिंहगड रस्ता परिसरात सर्वाधिक फटका बसला असून, अनेकांचे संसार उद्धस्त झाले आहेत. जलसंपदा विभागाने जास्त पाणी सोडले यावरून आरोप प्रत्यारोप सुरु झाले आहेत. पण त्याचसोबत नदीपात्रात राडारोडा टाकून पात्र अरुंद केल्यानेही पाण्याचा फुगवटा निर्माण झाला असल्याचे समोर आले आहे.

राजाराम पूल ते शिवणे दरम्यान मुठा नदीच्या पात्रात खासगी जागा मालकांनी हजारो ट्रक राडारोडा टाकून पात्र बुजविले आहे. त्या जागांवर व्यावसायिक वापर करण्याचा हेतू होता. यामध्ये प्रामुख्याने राजाराम पूल ते वारजे पूल दरम्यान जास्त राडारोडा टाकण्यात आला आहे, त्यातून अनेक एकर जमीन निर्माण केली. खडकवासला धरणातून पाणी सोडल्यानंतर या राडारोड्यामुळे एकता नगरी भागात पाण्याचा फुगवटा निर्माण झाला. सिंहगड रस्त्यावरून येणाऱ्या नाल्याचे पाणीही वस्तीमध्ये घुसले असे महापालिका अधिकाऱ्यांच्या निर्दशनास आले आहे. एकतानगरी व परिसरातील अन्य कॉलनीमधील पुराचा धोका कमी करण्यासाठी आजपासून राडारोडा काढण्याचे काम सुरु केले आहे. त्याकामासाठी २५ जेसीबी आणि ५० डंपर जुंपण्यात आले आहेत. दिवसभरात २०० डंपर राडारोडा काढण्यात आला आहे, असे परिमंडळ तीनचे उपायुक्त माधव जगताप यांनी सांगितले.

कर्वेनगर, शिवणे, कोंढवे धावडे आदी भागात नदीच्या कडेने राडारोडा टाकला आहे. आज तो राडारोडा नदीपात्रातून काढून जवळच असलेल्या खासगी जागेत टाकला जात आहे. महापालिकेचा वाघोली येथे सी अॅड डी प्रकल्प आहे. येथे राडारोडा नेऊन टाकणे आवश्यक आहे. त्यावर माधव जगताप म्हणाले, 'सध्या नदीपात्रातील राडारोडा काढण्याचे काम प्राधान्याने काढून तेथेच जवळच टाकला जात आहे. त्यानंतर तो वाघोलीतील खाणीत नेऊन टाकला जाईल.

# गुंडाविरोधी पथकाने पाच जणांच्या मुसक्या आवळल्या

**पिंपरी । प्रतिनिधी**




गुंडाविरोधी पथकाने दोन वेगवेगळ्या कारवायांमध्ये पाच सराईतांच्या मुसक्या आवळल्या आहेत. यामध्ये खुनाच्या तसेच गोळीबार प्रकरणातील आरोपींचा समावेश आहे. आरोपींकडून चार पिस्तूल आणि बारा जिवंत काडतूस जप्त करण्यात आली आहेत.

विवेक उर्फ विकी राजेश खराडे (२०, रा. रामलिंग रोड, कामाठीपुरा, शिरुर), पांडुरंग उर्फ पांडा बालाजी कांबळे (२४, रा. रामलिंग, तुकाईमळा, ता. शिरूर), रोहित दुर्गेश धर्माधिकारी (वय २२), अनिकेत सतीश काजवे (२८, दोघे रा. प्रियदर्शनीनगर, जुनी सांगवी), तुषार ऊर्फ गोल्या रामराव राठोड (२६, रा. तापकीरनगर, गजानन महाराज मंदिराजवळ, आळंदी) अशी अटक आरोपींची नावे आहेत. सहायक निरीक्षक हरीश माने यांनी दिलेल्या माहितीनुसार, तळेगाव दाभाडे येथे सव्वा महिन्यापूर्वी सहा ठिकाणी हवेत गोळीबार झाल्याची घटना घडली होती. या घटनेतील मुख्य आरोपी फरार होते. दरम्यान, आरोपी नवी मुंबई येथे असल्याची माहिती पथकाला मिळाली होती. त्यानुसार, पथकाने विवेक खराडे आणि पांडुरंग कांबळे यांना नवी मुंबईतून जेरबंद केले. आरोपींकडून पथकाने दोन पिस्तूल आणि चार जिवंत काडतुसे जप्त केली आहेत. या प्रकरणात गुंडा विरोधी पथकाने यापूर्वी रोहन शिंदे, नीरज उर्फ दाद्या बाबू पवार व आदित्य नितीन भोईनल्लू यांना अटक केली आहे. आरोपींनी आपसात संगनमत करुन २० जून रोजी तळेगाव दाभाडे येथे सहा ठिकाणी हवेत अंदाधुंद गोळीबार केला होता.

# वाघाची कातडी विकणारं आंतरराष्ट्रीय रॅकेट उद्ध्वस्त

**पुणे । प्रतिनिधी**

## गाईला विष देऊन वाघीणीच्या तोंडी दिलं, पुणे सीमा शुल्क विभागाने केली वाघाची ५ कोटींची कातडी जप्त

वाघांची शिकार करून कातडी विकणार मोठं रॅकेट केलं पुण्यात उद्धुस्त करण्यात आलं आहे. पुणे सीमा शुल्क विभागाने मोठी कारवाई करत या प्रकरणात सहा जणांना ताब्यात घेतलं आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात या कातडीची किंमत पाच कोटी रुपये असल्याचं सांगितलं जात आहे.

वाघाची कातडी विकणारा एक ग्रुप जळगाव जवळ आल्याची माहिती नागपूर सीमा शुल्क विभागाने पुणे सीमा शुल्क विभागाला दिली. त्याचा तपास करण्यासाठी २६ तारखेला पुण्यातून पथक निघालं. मिळालेल्या माहितीनुसार कारवाई करत सीमा शुल्क विभागाने सहा जणांना ताब्यात घेतलं. ताब्यात घेण्यात आलेल्यांपैकी सहा जणांमध्ये दोन महिलांचा समावेश आहे. रहीम रफिक हा या टोळीचा म्होरक्या असल्याची माहिती आहे. ताब्यात घेण्यात आलेली कातडी ही पाच फूट लांब असणाऱ्या वाघीणीची असल्याची माहिती आहे. ही वाघीण चार ते पाच वर्षांची असल्याचं सांगितलं जातंय. आंतरराष्ट्रीय बाजारात या कातडीची किंमत पाच कोटी असल्याचं सांगितलं जातंय. सीमा शुल्क विभागाने या प्रकरणी १९७२ कायद्यान्वये गुन्हा दाखल केला.

तस्करांनी एका वनगाईला विष देऊन ठार मारलं आणि ती गाय वाघाच्या तोंडी दिली. ती गाय वाघाने खाल्ल्याने वाघाचा त्यामध्ये मृत्यू झाल्याचं तपासातून उघडकीस आलं आहे. अटक करण्यात आलेल्यांपैकी रहीम खानची चौकशी केल्यानंतर त्याला यापूर्वी देखील फॉरेस्ट डिपार्टमेंटने अटक केली होती अशी माहिती समोर आली. तर मोहम्मद आशर खान हा भोपाळचा रहिवासी असल्याची माहिती आहे. त्यामुळे जळगावात सापडलेल्या या प्रकरणाता भोपाळ आणि त्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय स्तरावर काही संबंध आहे का याचा तपास सुरू करण्यात आला आहे. पुणे सीमा शुल्क या प्रकरणी अधिकचा तपास करत असून यामध्ये आणखी कुणाचा सहभाग आहे, कोणतं रॅकेट कार्यरत आहे याची माहिती घेत आहे.

# पोलिस असल्याचे सांगून ज्येष्ठाला २१ लाखांना लुबाडले

**पुणे । प्रतिनिधी**

पोलिस असल्याची बतावणी करून ज्येष्ठ नागरिकाची सुमारे २१ रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. वानवडी परिसरात १५ ते २८ जुलै या कालावधीत हा प्रकार घडला.



या प्रकरणी साळुंके विहार येथील एका ७७ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाने वानवडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरून सायबर चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी ज्येष्ठ व्यक्ती वानवडी परिसरातील साळुंके विहार रस्त्यावरील एका उच्चभ्रू सोसायटीमध्ये राहतात. त्यांना १५ जुलै रोजी सायबर चोरट्यांनी मराठे आणि विजय खन्ना या नावाने मोबाईलवर संपर्क साधला. त्यांना पोलिस असल्याची बतावणी करून 'तुम्ही गैरकृत्य केले असल्याचे सांगत कारवाई करू,' अशी धमकी दिली. कारवाई न करण्यासाठी त्या ज्येष्ठ नागरिकास बंगळूर येथील एका बँक खात्यात ऑनलाइन पैसे भरण्यास सांगितले. त्यावर या ज्येष्ठ नागरिकाने भीतीपोटी सायबर चोरट्यांच्या बँक खात्यात वेळोवेळी २० लाख ८० हजार रुपये जमा केले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. सायबर पोलिसांनी गुन्हा दाखल करून तो वानवडी पोलिस ठाण्यात वर्ग केला आहे. पुढील तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय पतंगे करीत आहेत.

# तोल गेल्याने शाळकरी मुलगा पुलावरुन पडला पाण्यात

**पुणे । प्रतिनिधी**

पूना हॉस्पिटल येथील यशवंतराव चव्हाण पुलावरून एक शाळकरी मुलगा (वय १२) तोल गेल्याने पाण्यात पडला. ही घटना सोमवारी (ता. २९) सायंकाळी सव्वापाच वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेनंतर अग्निशामक दलाच्या जवानांकडून शोधकार्य सुरू करण्यात आले आहे.



खडकवासला धरणातून मुठा नदीत मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग सुरू आहे. त्यामुळे नदीपात्रातील पाणी बघण्यासाठी नागरिकांनी शहरातील पुलांवर गर्दी केली आहे. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, सदाशिव पेठेतील पूना हॉस्पिटलजवळ पुलावर तो बसला होता. त्याचा अचानक तोल गेल्यामुळे तो दप्तरासह पाण्यात पडला. तेथील नागरिकांनी अग्निशामक दलाच्या नियंत्रण कक्षास माहिती दिली. अग्निशामक दलाकडून तातडीने दोन पथके रवाना करुन शोधकार्य सुरू केले आहे. या शाळकरी मुलाने निळ्या रंगाचा गणवेश परिधान केलेला होता.

नदीपात्रात सध्या पाण्याचा प्रवाह अधिक आहे. कसबा आणि येरवडा अग्निशामक केंद्राकडून टिळक पूल आणि बंडगार्डन पुलाजवळ जवानांकडून मुलाचा शोध घेण्यात येत आहे. तसेच, संगम घाटालगत रेस्क्यू व्हॅन तैनात करण्यात आल्याची माहिती अग्निशामक दलाच्या सूत्रांनी दिली.

# शि. द. फडणीस यांनी काढून ठेवलेली व्यंगचित्र सोपी नाहीत-राज ठाकरे



**पुणे । प्रतिनिधी**

शि. द. फडणीस यांनी काढून ठेवलेली व्यंगचित्र ही वरवर सोपी आणि सहज वाटत (झींपश)असली तरी ती व्यंगचित्र दिसायल सोपी आहेत परंतू ती सोपी नाहीत , त्यासाठी परिश्रम आणि चिंतनाची बैठकच लागते असे मत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी व्यक्त केले .

शिवराम दत्तात्रय फडणीस अर्थात सर्वांचे लाडके ज्येष्ठ व्यंगचित्रकार शि. द. फडणीस यांनी १०० व्या वर्षांत पदार्पण केले त्या निमित्त वसुंधरा क्लब आणि कार्टूनिस्ट्स कम्बाईन यांच्या संयुक्त विद्यमाने कोहिनूर प्रस्तुत 'शि. द. १००' या भव्य चार दिवसांच्या महोत्सवास आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या हस्ते फडणीस यांच्या सत्काराने झाला त्यावेळी ठाकरे बोलत होते .हा महोत्सव आज पासून १ ऑगस्ट पर्यंत चालणार आहे .

यावेळी व्यासपीठावर महोत्सवाचे निमंत्रक राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण वस्त्रोद्योग व संसदीय कार्यमंत्री चंद्रकांतदादा पाटील , ज्येष्ठ चित्रकार वासुदेव कामत , प्रसिद्ध लेखिका मंगला गोडबोले ,महोत्सवाचे स्वागताध्यक्ष कोहिनूर ग्रुपचे मुख्य कार्यकारी संचालक कृष्णकुमार गोयल, सुहृद होम्स अॅन्ड हॉलिडेज, पुणेचे सहसंस्थापक मकरंद केळकर, स्किन सिटीचे संचालक डॉ . नितीन ढेपे, महोत्सव संयोजक वसुंधरा क्लबचे वीरेंद्र चित्राव, कार्टूनिस्ट्स कम्बाईनचे चारुहास पंडित ,संजय मिस्त्री आणि नचिकेत ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते .

'शिदं'चा हा हृद्य नागरी सत्कार सोहळा बालगंधर्व रंगमंदिरात संपन्न झाला .यावेळी 'शिदं'चा सन्मान पुणेरी पगडी, उपरणे आणि मानपत्र देऊन करण्यात आला .राज ठाकरे यावेळी म्हणाले , शंभराव्या वर्षात देखील फडणीस ज्या ताठ कण्याने चालत आहेत त्याच्या निम्या स्वाभिमानाने राज्य सरकारने सरकार चालवावे .या ही झाडाची फळे हवीत त्या ही झाडाची फळे हवीत या हट्टाहासामुळे स्वतःचे हसे करून घेऊ नये .व्यंगचित्रकार शि. द. फडणीस आणि राज्याचे उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्यातील आडनावाचे साधर्म्य हेरत राज ठाकरे मिश्किलपणाने म्हणाले की व्यंगचित्रकार शि. द. फडणीस हे त्यांच्या आडनावततील केवळ व च्या फरकामुळे वाचले आणि ते व्यंगचित्राच्या क्षेत्रात आले . हा व चा फरक राहिला नसता तर ते ही राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या लायनीत गेले असते आणि केवळ फडणवीसां सारखे व्यंगचित्र बनून रहिले असते .राज ठाकरे पुढे म्हणाले , केवळ कल्पन सुचली परंतू त्याला साजेसे कल्पक व्यंगचित्राची जोड नाही मिळाली तर ती कल्पना रुचत नाही तसेच व्यंगचित्र उत्तम आहे परंतू कल्पना व्यंगचित्राला साजेशी नसेल तर ते व्यंगचित्र फसते म्हणून चांगले व्यंगचित्र आस्तित्वात येण्यासाठी दोन्ही गोष्टी आवश्यक आहेत . व्यंगचित्रकार शि.द. फडणीस यांच्या एका ही व्यंगचित्रात हे समीकाण बिघडलेले दिसत नाही , म्हणूनच फडणीस यांची व्यंगचित्रे तांत्रीक दृष्ट्या परिपूर्ण तर आहेतच परंतू ती सर्वसामान्यांच्या मनाचा ठाव घेतात. महोत्सवाचे निमंत्रक राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण वस्त्रोद्योग व संसदीय कार्यमंत्री चंद्रकांतदादा पाटील त्यांच्या मनोगतात म्हणाले , पुणे महानमापालिकेच्या माध्यमातून पुण्यात व्यंगचित्रकार शि.द. फडणीस यांच्या कार्याचा गौरव म्हणून लवकरच अकादमी सुरू करण्यात येईल . राज्य सरकारन या अकादमीसाठी पूर्ण क्षमतेने आर्थिक पाठबळ देईल असे आवासन ही पाटील यांनी यावेळी दिले .व्यंगचित्र क्षेत्रातील माहितगार तज्ज्ञांनी यासाठी पुढाकार घेऊन अभ्यासक्रमाची आखणी करावी, सरकारचा प्रतिनिधी आणि विभागाचा मंत्री या नात्याने आपण या पुढाकारास पूर्ण न्याय देऊ .तसेच व्यंगचित्रकार शि.द.फडणीस यांना महाराष्ट्र भूषण आणि पद्म पुरस्कार मिळावा यासाठी देखील आपण प्रयत्न आणि शिफारस करू.

# लाडकी बहीण योजनेचा बॅनर पुण्यातील आमदाराच्या अंगलट; महिलांनी थेट पोलिस आयुक्तांनाच गाठलं

**पुणे । प्रतिनिधी**

राज्य सरकारची महत्वाकांक्षी योजना असलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची सध्या राज्यभर चलती आहे. या योजनेसाठी आत्तापर्यंत तब्बल १ कोटी महिलांना आपला अर्ज दाखल केला आहे. राज्य सरकारकडून १९ ऑगस्टपर्यंत महिलांना या योजनेचा थेट लाभ मिळणार असून महिलांच्या खात्यात २ महिन्यांचे ३००० रुपये जमा होणार आहेत. त्यामुळे, या योजनेसाठी शासकीय स्तरावर अर्ज भरले जात असून लोकप्रतिनिधीही शिबीर भरवत आहेत. विविध माध्यमांतून या योजनेचा लाभ घेण्यासाठी महिला भगिनींना आवाहन केलं जात आहे. मात्र, अशाप्रकारे महिलांना लाडकी बहीण योजनेचं आवाहन करणं भाजप आमदाराच्या अंगलट आलं आहे. पुण्यातील शिवाजी नगर परिसरात भाजप आमदाराने लावलेल्या बॅनरवरुन आता चांगलाच वाद निर्माण झाला आहे. या बॅनरवरुन महिलांनी थेट आमदाराविरुद्ध पोलीस ठाण्यात धाव घेतली.



पुण्यातील शिवाजीनगर विधानसभा मतदारसघात मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेच्या बॅनरवर सहमती शिवाय फोटो लावल्याचा आरोप बॅनरवर फोटो झळकलेल्या महिलांनी केला आहे. पुण्यात शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघातील भाजपचे आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी मतदारसंघात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजेनेचे बॅनर लावले आहेत. त्या बॅनरवर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्यासह आमदार सिध्दार्थ शिरोळे यांचाही फोटो आहे. मात्र, या नेत्यांच्या फोटोसह या दोन महिलांचे फोटो देखील बॅनरवर लावले आहेत. या बॅनरवर झळकलेल्या महिलांपैकी एकीचं नाव नम्रता अंकुश कावळे तर दुसरीचं नाव भागीरथी माणिक कुरणे असं आहे. या दोन्ही महिलांच्या संमतीशिवाय त्यांचे फोटो बॅनरवर लावण्यात आल्याचा आरोप या महिलांनी केला आहे. विशेष म्हणजे आमदाराने संमतीशिवाय योजनेच्या जाहिरातीवर आपले फोटो लावल्याने महिलांना थेट पुणे पोलिस आयुक्तांकडे तक्रार दिली.

## आमदाराकडून दिलगिरी

दरम्यान, कोणालाही दुखवण्याची आमची भावना नाही. ही योजना महिलांसाठी आहे, आमचा हेतू वाईट नाही, योगायोगाने हा फोटो त्या बॅनरवर आला आहे. जर कोणाच्या भावना दुखावल्या असतील तर दिलगिरी व्यक्त करतो, अशी भावना आमदार शिरोळे यांनी या पोलीस तक्रारीनंतर माध्यमांशी बोलताना व्यक्त केली आहे. मात्र, आमदार शिरोळे यांनी झळकावलेले बॅनर आणि त्यावरुन सुरू झालेल्या वादाची चंगलीच चर्चा मतदारसंघात सुरू झाली आहे.

cmyk